रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २४८
www.ramprahar.com
बुधवार, २७ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

माजी खासदार शिवाजीराव पाटील राष्ट्रवादीत दाखल/२
रायगडच्या जंगल भागातील पाण्याचे स्रोत झाले स्वच्छ!/५
आक्षी खाडीत रंगली होड्यांची शर्यत/८

## काँग्रेसचे माजी आमदार नामदेव उसेंडी भाजपमध्ये



**नागपूर :** गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे डॉ. नामदेव किरसान यांना उमेदवारी दिली आहे, तर भाजपने विद्यमान खासदार अशोक नेते यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. त्यामुळे या मतदारसंघात काँग्रेस विरुद्ध भाजप अशी लढत होणार आहे, मात्र निवडणुकीपूर्वी काँग्रेसला मोठा झटका बसला आहे. काँग्रेसचे माजी आमदार नामदेव उसेंडी यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. उसेंडी हे २००९मध्ये काँग्रेसकडून गडचिरोली विधानसभा मतदासंघातून निवडून आले होते. या वर्षी ते पुन्हा काँग्रेसकडून लोकसभेसाठी इच्छूक होते, पण त्यांना तिकीट नाकारण्यात आले. त्यामुळे नामदेव उसेंडी यांनी बंडाचे हत्यार उपसले आहे. राजीनामा दिल्यानंतर उसेंडी यांनी नागपूर येथे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

# सुधीरभाऊंची तोफ आता दिल्लीत धडाडेल!

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून विजयाचा विश्वास; अर्ज दाखल

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

जे संपूर्ण जगाला जमले नाही, ते पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दहा वर्षांत करून दाखवले. त्यांनी २५ कोटी लोकांना गरीबीतून वर आणले. अब की बार ४०० पार. मोदीजींना पुन्हा एकदा भारताचे पंतप्रधान करणार आहोत. सुधीर मुनगंटीवार यांचा आवाज आजपर्यंत राज्यात घुमत होता आता तीच तोफ दिल्लीत धडाडेल. ते मोठ्या मतांनी विजयी होतील, असा विश्वास भाजप नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

भाजपने महाराष्ट्रातील लोकसभा मिशन ४५+ची सुरुवात चंद्रपूरमधून केली आहे. भाजपचे चंद्रपूर लोकसभेचे उमेदवार मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा उमेदवारी अर्ज मंगळवारी (दि.२६) दाखल करण्यात आला. तत्पूर्वी गांधी चौकात झालेल्या विजय संकल्प सभेत उपमुख्यमंत्री



फडणवीस बोलत होते. या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, खासदार रामदास तडस, आमदार संदीप धुर्वे, अशोक उईके, आशिष देशमुख आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ही राज्याची नाही, तर ही देशाची निवडणूक आहे. देश कुणाकडे सोपवायचा आहे, देशात राज्य कोणाचे आणायचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे की राहुल गांधींचे याचा निर्णय करणारी ही निवडणूक आहे. सुधीर मुनगंटीवार यांना दिलेले मत मोदीजींना दिलेले मत ठरेल.

महाराष्ट्रात महायुती भक्कम झाली आहे. भाजपसोबत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं, रासप असे अनेक पक्ष आहेत. भाजप किंवा महायुतीशिवाय कोण विकास करू शकतो, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

> **चंद्रपूर लोकसभेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माझी आदरपूर्वक निवड केली आहे. आता मला चंद्रपूरला एक नंबरचा मतदारसंघ करायचा आहे. मी निवडून आलो तर मतदारांच्या प्रगतीची उंची नक्कीच वाढेल.**
> **-सुधीर मुनगंटीवार, उमेदवार**

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी, महाराष्ट्रातून ४५ खासदार महायुतीचे निवडून येतील आणि त्याची सुरुवात चंद्रपुरातून होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकसित भारत आणि महाराष्ट्राची गॅरंटी घेतली आहे. यासाठी आज आपण चंद्रपूरच्या विकासाची एक वीट लावत आहोत, असे नमूद केले.

**चंद्रपूर** : लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे अधिकृत उमेदवार भाजप नेते, मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत विजय संकल्प सभा घेण्यात आली. त्यानंतर तेथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली. या वेळी पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, स्थानिक नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रायगडमधून सुनील तटकरे लोकसभा निवडणूक लढवणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

**पुणे : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी (दि.२६) पुण्यात झालेल्या पक्षाच्या बैठकीनंतर लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांबाबत माहिती दिली. रायगड लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि विद्यमान खासदार सुनील तटकरे हे महायुतीचे उमेदवार असतील, अशी घोषणा त्यांनी या वेळी केली तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मी स्वत: आणि महायुतीतील इतर घटक पक्षांचे महत्त्वाचे नेते २८ मार्च रोजी एकत्रित पत्रकार परिषद घेऊन महायुतीचे सर्व जागांवरील उमेदवार घोषित करू, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आमच्या आमदारांची बैठक झाली. आम्ही महायुतीच्या ४८ जागांबद्दल चर्चा करून कुणी कुठे जागा लढवायच्या याचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. आता मी सांगतो की ९९ टक्के जागावाटपाचे काम फायनल झाले आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी उमेदवार दिले आहेत. आज मी पहिली जागा जाहीर करतो आहे. रायगड लोकसभा मतदारसंघातून खासदार सुनील तटकरे हे महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवतील. मुख्य आणि घटक पक्ष मिळून ४८ जागा लढवत आहोत. २८ मार्चला तुम्हाला महायुतीच्या जागावाटपाचे चित्र स्पष्ट होईल.

सध्या मी बारामतीचा सस्पेन्स ठेवतो, मात्र तुमच्या मनात जे नाव आहे तीच व्यक्ती बारामतीतून उमेदवार असेल, असे सूचक भाष्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी करीत सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीचे संकेत दिले आहेत.

पाच वर्षांपूर्वी निवडणुका झाल्या तेव्हा लोकसभेच्या ४८ जागांवर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस युतीत लढले आणि आम्ही महाविकास आघाडी म्हणून लढलो. आता कारण नसताना आम्हाला तीनच जागा मिळतील वगैरे गैरसमज पसरवले गेले. २३ आणि १८ जाग भाजप आणि शिवसेनेने २०१९मध्ये जिंकल्या होत्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे चार, काँग्रेस एक आणि आम्ही पुरस्कृत केलेल्या नवनीत राणा यांनी अपक्ष उमेदवार म्हणून एक जागा जिंकली होती, परंतु आता काहीजण राष्ट्रवादी काँग्रेसला जागावाटपात फक्त तीन जागा मिळाल्या, असा गैरसमज पसरवत आहेत. वास्तविक महायुतीत कोणतेही गैरसमज नाहीत. आमच्या मित्रपक्षांची इतकीच भूमिका आहे की भाजपने २३ जागा जिंकल्या, शिवसेनेने १८ जागा जिंकल्या. या जागा त्यांना मिळाव्यात. यावर आता चर्चा करून मार्ग काढला जाईल तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला जितक्या जागा मिळायला हव्यात त्या मिळण्यासाठी दोन्ही मित्रपक्षांनी सहकार्याची भूमिका घेतली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

## निवडक

### पाकिस्तानात आत्मघाती हल्ला; पाच चिनी नागरिकांचा मृत्यू

**इस्लामाबाद** : पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वामध्ये झालेल्या आत्मघाती दहशतवादी हल्ल्यात पाच चिनी नागरिक आणि एक स्थानिक चालकाचा मृत्यू झाला आहे. एका दहशतवाद्याने स्फोटकांनी भरलेले वाहन चिनी अभियंत्यांच्या ताफ्यात घुसवले आणि दुसऱ्या वाहनाला धडक दिली. या घटनेतील मृतांचा आकडा वाढू शकतो, असे म्हटले जात आहे.

### मालवाहू जहाजाच्या धडकेने ऐतिहासिक पूल कोसळला

**न्यूयॉर्क :** अमेरिकेतील बाल्टीमोर शहरातील पटाप्सको नदीवरील ऐतिहासिक फ्रान्सिस स्कॉट ब्रिज मंगळवारी कोसळला. या पुलाला एका मालवाहतूक जहाजाने धडक दिली. पूल कोसळला तेव्हा कमीत कमी सात जण आणि १२हून अधिक गाड्या नदीत कोसळल्या. यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याची शंका व्यक्त केली जात आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, या घटनेनंतर बचाव व मदतकार्य हाती घेण्यात आले.

# चारशे पार लक्ष्य गाठण्यासाठी कामाला लागा -माजी आमदार सुरेश लाड

### खोपोलीत भाजपच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत चारशे पार जागांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. यासाठी या नूतन पक्ष कार्यालयाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवावे, घरोघरी जाऊन संपर्क साधावा, असे आवाहन भाजप नेते, माजी आमदार सुरेश लाड यांनी केले. खोपोली भाजपच्या नूतन जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

नूतन कार्यालयाच्या उद्घाटन समारंभास व्यासपीठावर उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील, कर्जत खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, कर्जतचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, श्रीकांत पुरी, सनी यादव, आत्करगावचे माजी सरपंच संदीप पाटील, खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर महिला मोर्चा शहर अध्यक्ष शोभा काटे, जिल्हा सरचिटणीस अश्विनी अत्रे, भाजप शहर सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुलकर, युवा मोर्चा अध्यक्ष डॉ. निकेत पाटील, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, वैद्यकीय सेलचे डॉ. नागरगोजे, माजी शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर..)



### दिलेली जबाबदारी पूर्ण करा -जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, पक्षाचे काम कार्यकर्त्यांनी योग्यरीतीने करावे व जी जबाबदारी मिळेल ती प्रामाणिकपणे पूर्ण करावी असे सांगून लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मतांनी निवडून आणण्यासाठी सर्वांनी अहोरात्र प्रयत्न करावे. तुमच्यासमोर उमेदवार पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत असे समजून काम करा. आता तयारी केली तर आगामी खोपोली नगरपालिका निवडणुकीत आपली ताकद दिसून येईल. यासाठी सुरेश लाड यांच्या नेतृत्वाखाली पक्ष वाढवण्यासाठी कार्यरत राहा, असे आवाहन केले.

# लाचारी मान्य करणार नाही!

## प्रकाश आंबेडकरांचा महाविकास आघाडीला इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत काही मतदारसंघांबाबत मतभेद असून अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. यावरून वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला २६ मार्चपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी त्यांच्या आजोबांचा म्हणजेच दिवंगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करीत महाविकास आघाडीला इशारा दिला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, गेल्या काही दिवसांमध्ये आमचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी युतीसंदर्भात त्यांची मते मांडली. मला कार्यकर्त्यांसह सर्वांना सांगायचे आहे की, माझ्या आजोबांनी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) चालवलेली चळवळ ही लाचारीच्या विरोधात होती. ही लाचारी मीदेखील मान्य करणार नाही. युतीमध्ये अडचण येईल म्हणून आम्ही कोणतेही व्यक्तीगत वाद किंवा हेवेदावे मध्ये येऊ दिले नाहीत, पण जिथे चळवळीलाच लाचार केले जाते, संपवले जाते ते आम्ही मान्य करणार नाही. त्यामुळे मी सर्व शाहू, फुले आणि आंबेडकरी मतदारांना आवाहन करतो की, आपण जिंकलो पाहिजे ही माझी भावना आहे, पण मी आज त्यांना सांगतो की चळवळीचा विचार अधिक महत्त्वाचा आहे.



### खोटे बोलणे थांबवा!

ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी वंचित बहुजन आघाडीला चार जागांचा प्रस्ताव महाविकास आघाडीने दिला असल्याचे सांगितले होते. यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, मी त्यांना (ठाकरे गट) त्या चार जागा परत देतो, त्यांनी त्या लढवाव्या. संजय राऊत हे चार जागा म्हणत असले तरी त्यांनी बैठकीला गेल्यानंतर एक अकोला आणि दोन दुसऱ्या जागा अशा तीन जागा देण्यासंदर्भात सहमती दर्शवली होती. त्यामुळे खोटे बोलणे थांबले पाहिजे.

# कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतदानाची भरपगारी सुट्टी

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील पाच टप्प्यांत मतदान होणार आहे. या निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. याबाबतचे परिपत्रक शासनाने जारी केले आहे.



भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्यात या निवडणुकीचे मतदान १९, २६ एप्रिल, ७, १३ व २० मे अशा पाच टप्प्यांत होणार आहे. निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

या आदेशानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल, तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे, मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहणार आहे. उद्योग विभागांतर्गत येणारी सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांनी या सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी लागणार आहे.

मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येणार आहे, अशा सूचनाही या आदेशाद्वारे देण्यात आल्या आहेत.

## रसायनीत दोन जणांचा बुडून मृत्यू

**मोहोपाडा** : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुडून दोघांचा मृत्यू झाल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना घडल्या आहेत.

यातील पहिल्या घटनेत होळीच्या दिवशी मोहोपाडा आळी आंबिवली येथील शालेय विद्यार्थी गणेश विनोद चव्हाण (वय १४) हा मित्रांसोबत पाताळगंगा एमआयडीसी पंपहाऊसजवळील नदीपात्रात पोहण्यासाठी गेला होता, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडून मयत झाला. यानंतर धुलिवंदनच्या दिवशी जांभिवली धरणात एका अनोळखी व्यक्तीचे प्रेत पाण्यात सडलेल्या अवस्थेत आढळले. त्याचे वय अंदाज ४० ते ४५ वर्ष आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

# अकोला विधानसभा पोटनिवडणूक रद्द

**नागपूर : प्रतिनिधी**

अकोला पश्चिम विधानसभा पोटनिवडणुकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मान्य करून ही पोटनिवडणूक रद्द ठरवली आहे. यावर मंगळवारी (दि.२६) सुनावणी करताना अकोला (पश्चिम) निवडणुकीवर न्या. अनिल किलोर आणि न्या. एम. एस.जवळकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीबरोबर काही राज्यांतील विधानसभेच्या पोटनिवडणुकांची घोषणा केली होती. त्यात अकोला पोटनिवडणुकीचाही समावेश होता. येत्या २६ एप्रिल रोजी ही निवडणूक होणार होती. त्या दृष्टीने विविध राजकीय पक्षांनी तयारीदेखील सुरू केली होती, मात्र याचिकाकर्ते अनिल दुबे यांनी अकोला पश्चिम पोटनिवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मुख्य निवडणुकीला एक वर्षाहून कमी कालावधी असताना पोटनिवडणूक घेता येत नसल्याची तरतुद कायद्यात असल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला होता. त्यानुसार न्यायालयाने ही निवडणूक रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

# माजी खासदार शिवाजीराव पाटील राष्ट्रवादीत

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले स्वागत



**मंचर : प्रतिनिधी**

शिवसेनेचे शिरूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंगळवारी (दि.२६) राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शिरूर मतदारसंघातील मंचर येथील शिवगिरी मंगल कार्यालयात उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा झाला.

या पक्षप्रवेश सोहळ्यास राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटीलदेखील उपस्थित होते. शिवाजीरावांच्या पक्षप्रवेशावेळी त्यांच्या शेकडो समर्थक कार्यकर्त्यांनीदेखील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या निवडणूक चिन्हावर शिरूरची लोकसभा निवडणूक लढवणार आहेत असे बोलले जात होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. त्यांच्या शिष्टाईनंतर खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील आणि आढळराव यांच्यात दिलजमाई झाली. त्यामुळे आढळराव यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्षप्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. त्यानुसार शिवाजीरावांनी मंगळवारी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला.

### अमोल कोल्हेंवर टीका


*या वेळी शिवाजीराव आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांना लक्ष्य केले. मला फेकाफेकी करता येत नाही. मी हाडाचा राजकारणी नाही. मला कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. माझा राजकीय प्रवास आणि इतिहास तुम्हाला माहितीच आहे. मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवर हात ठेवूनी फक्त लढ म्हणा या उक्तीप्रमाणे मी अमोल कोल्हे यांनी पराभव केल्यानंतरही विकासकामे करीत राहिलो, असे पाटील यांनी या वेळी म्हटले.*

# तळीये गावातील घरांचे काम युद्धपातळीवर सुरू

## पायाभूत सुविधांमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अतिवृष्टीमुळे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत रायगड जिल्ह्यातील तळीये गाव व आजूबाजूच्या वाड्यांमधील घरे उद्ध्वस्त होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली होती. जानेवारी महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोणेरे येथे तळीये गावातील काही ग्रामस्थांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. गावात मूलभूत आणि पायाभूत सुविधांमुळे बहुतांश ग्रामस्थ हक्काच्या घरात राहायला आले आहेत. उर्वरित ग्रामस्थांनाही लवकरच घरे मिळणार आहेत. त्यासाठी सरकारच्या वतीने युद्धपातळीवर काम सुरू आहे.



कोकणातील मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा लक्षात घेता तळीये गावातील घरे बनविली आहेत. घरांच्या भिंती फायर प्रूफ आहेत. घराच्या भिंतीसोबत छतही कोकणातील परिस्थिती लक्षात घेऊन बनवण्यात आले आहे. प्रत्येक घरात हॉल, बेडरूम, किचन आणि शेतीच साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र जागा आहे.

गावातील पाणी आणि विजेची समस्या सोडविण्यात आली आहे. याबाबत प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे यांनी सांगितले की, सरकारने वाटप केलेल्या घरात सुरळीत पाणीपुरवठा सुरू आहे. काही ठिकाणी टंचाई असल्यास टँकरने पाणी पुरविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

### पाण्यासाठी टाक्या

***प्रत्येक घरावर सोलर पॅनल आणि वॉटर हार्वेस्टिंगसाठी पाण्याच्या टाक्या बसविल्या आहेत. कोकणात मोठ्या प्रमाणावर वादळवारा असल्याने अनेकदा वीजपुरवठा खंडित होतो. त्यासाठी घरांच्या छतावर सोलार पॅनल बसवले आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होणार नाही. पावसाळ्यातील पाणी अडविण्यासाठी पाण्याच्या मोठ्या टाक्या बसविल्या आहेत.***

# चौलमधील ताडगोळ्यांना उन्हाळ्यात खास पसंती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलमधील ताडगोळे स्थानिकांसह पर्यटकांची खास पसंती असून उन्हाळ्यात या ताडगोळ्यांना विशेष मागणी असते. चौल परिसरात ताडगोळ्यांची अनेक झाडे असून ताडगोळे विक्रीतून मोठे उत्पन्न स्थानिकांना मिळते.

उन्हाळ्याचे दिवसात थंडावा म्हणून तोडगोळे खाण्याचा सल्ला दिला जातो. या फळातील गर पाणीदार व चवदार असून उंच उंच ताडाच्या झाडावर चढून काढण्यास कस लागतो. उन्हाळ्यात अंगाची लाही लाही होत असताना नैसर्गिक थंडावा देणारे ताडगोळे शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवतात.

अंगातील उष्णता कमी करणार्या ताडगोळ्यांचे आयुर्वेदातही अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. याची चव काहीशी शहाळ्यातील मलईसारखी असते.

ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यात सतत पुरळ येत असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोग प्रतिरोधी तत्वे असून विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले जाते.

या फळातील गरामुळे तसेच फळातील रसामुळे भूक शमविण्यास मदत होते. ज्यांना लिव्हरसंबंधी काही विकार असतील त्यांच्यासाठी ताडगोळ्यांचे सेवन उपयुक्त आहे.

या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्याने दिवसभरासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनातून मिळत असते. चौल परिसरात आर्थिक उत्पन्न देणारे ताडवृक्ष विपुल संख्येने असून या ताडाच्या वृक्षाची आणखी लागवड करणे गरजेचे आहे.



# ३१ मार्चपूर्वी मालमत्ता कर भरणा करण्याचे नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

मालमत्ता कर हा नवी मुंबई महापालिकेच्या महसुलाचा महत्त्वाचा स्त्रोत असून मालमत्ता करामार्फत प्राप्त होणाऱ्या निधीतून विविध नागरी सुविधा कामे करण्यात येत असतात. त्यादृष्टीने मालमत्ताकर वसुलीचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलण्यात येत आहेत.

याकरिता २९ फेब्रुवारी रोजीच जाहीर करण्यात आलेल्या मालमत्ताकर अभय योजनेंतर्गत २१ ते ३१ मार्चपर्यंत थकीत मालमत्ता करासह शास्तीची केवळ ५० टक्के रक्कम भरणा करावी लागणार आहे. म्हणजेच शास्तीच्या रक्कमेत ५० टक्के सूट मिळणार आहे. त्यामुळे मालमत्ताकर अभय योजनेचा लाभ घेऊन नागरिकांनी थकीत मालमत्ताकरावरील शास्तीच्या रक्कमेत भरीव सूट प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नागरिकांनी आपला विद्यमान मालमत्ताकर ३१ मार्चपूर्वी विहित वेळेत भरुन शहर विकासास हातभार लावावा, असेही आवाहन करण्यात येत आहे.

नागरिकांना आपला मालमत्ताकर सुलभ रितीने भरणा करता यावा या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या आठही विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रे तसेच मालमत्ताकर भरणा केंद्रे ३१ मार्चपर्यंत सुट्टीच्या दिवशीही कार्यालयीन वेळेत कार्यरत राहणार असून नागरिक नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन आपल्या घरातूनच ऑनलाईन करभरणा करू शकतात, तरी थकित मालमत्ताकर धारकांनी अभय योजनेंतर्गत शास्तीवर ५० टक्के सवलत मिळवावी व आपला थकित मालमत्ताकर भरणा करावा त्याचप्रमाणे विद्यमान वर्षाच्या मालमत्ता कराचा भरणाही ३१ मार्चपूर्वी करावा आणि शहर विकासाला हातभार लावावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# मुरूड कोळीवाड्यात होळीची अनोखी परंपरा

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात होळीचे थोडे वेगळे रूप पहायला मिळविते. मुरूडच्या प्रथेनुसार १५ दिवस अगोदर होळीच्या माळावर छोट्या होळीसाठी खड्डा खणून त्यात रात्री सुपारीचे झाड होळीत जाळले जाते. लहान-मोठे सर्वच होळीच्या सणात सामील होतात. ढोल-ताशा वाजवत, नाचत दिवस संपतो.

दिवसा लहान मुले विविध मुखवटे धारण करून प्रत्येक घरी लाकडी कुंडी मागण्यासाठी फिरतात. बाजारात, घरात जाऊन लाकडे किंवा पैसे गोळा करतात. पुढील १४ दिवस लहान मुलांचे होळीचे रंग दिसतात. मोठ्या होळीच्या दिवशी सकाळपासून कोळी बांधव पारंपरिक वेष परिधान करून मनाची होळी आणण्यासाठी ढोल-ताशा वाजवत सुपारी बागेत जातात व मालकाला पानाचा विडा, सुपारीचे मूल्य देऊन झाडाची पूजा करून झाड होळीच्या आहुतीसाठी तोडले जाते. नंतर ते झाड वाजत-गाजत बाजारात आणले जाते. बाजारात सुपारीचे झाड वाद्याच्या तालावर उंच उडण्याची स्पर्धा लागते. हे पाहण्यासाठी मुरूडकर मोठ्या संख्येने बाजारात जमतात. त्यानंतर कोळीवाड्यातील होळीदहन रात्री ८ वाजता होते. कोळीवाड्यांत विद्युत रोषणाई करण्यात येते. महिला पारंपरिक वेषात होळीभोवती ढोल-ताशांच्या तालात फेर धरतात. महिला होलिका मातेचे पूजन करतात आणि नवस बोलतात अशी परंपरा आहे. कोळीवाड्यात यावर्षी होळी दहन करण्याचा मान कोस्टगार्डचे कमांडर प्रशांत गोजरे यांना देण्यात आला. सोबत कोळी समाजाचे मनोहर बैले, मनोहर मकु, समाजबांधव उपस्थित होते.



स्थानिकांसह पर्यटकांनी लुटला आनंद

पान १ वरुन

## चारशे पार लक्ष्य गाठण्यासाठी कामाला लागा -माजी आमदार सुरेश लाड

या वेळी आमदार सुरेश लाड यांनी या नूतन जनसंपर्क कार्यालयातून सर्वसामान्यांची कामे व्हावी, त्यांना न्याय मिळावा असे सांगून सर्वसामान्यांच्या समस्या छोट्या असतात त्या सोडवल्या, तर त्यांच्या मनात केलेले काम कायम राहते, असे सांगितले. म्हणूनच पक्ष संघटनेसाठी कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त वेळ देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनीही महिला कार्यकर्त्यांनी पक्षकार्यात अग्रेसर राहावे, पक्ष जी जबाबदारी दिली ती पार पाडण्याचे आवाहन केले. भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी लोकसभा निवडणुकीत चारशे पार स्वप्न आपल्याला साकार करण्याचे आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी अथक प्रयत्न करावे, असे आवाहन केले. प्रारंभिक शहराध्यक्ष रमेश रेटरेकर व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. रेटरेकर यांनी प्रास्ताविकात भाषणात नूतन कार्यालयाच्या उभारणीबाबत ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे विशेषत: मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचे आभार मानले.




# पनवेल शहरातील टोईंग व्हॅन बंद

## वाहतूक कोंडी नियंत्रणात येतोय अडथळा

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल शहरातील वाहतूक कोंडीची समस्या नवीन नाही. कित्येक वर्षांपासून या समस्येवर तोडगा निघालेला नाही. शहरात बेकायदा वाहन पार्किंगवर निर्बंध रहावे म्हणून शहरात टोईंग व्हॅन चालवली जाते, मात्र कित्येक दिवसांपासून ही टोईंग व्हॅन बंद असल्याने याबाबत माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील यांनी वाहतूक पोलिसांना पत्र लिहून लवकरात लवकर टोईंग व्हॅन सुरू करण्याची मागणी केली आहे.

पनवेल शहर वाहतूक शाखेच पोलीस निरीक्षक संजय पाटील यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी वाहतूक पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्हदेखील उपस्थित केले आहे. शहरात अरूंद रस्ते असल्यामुळे बेकायदेशिररित्या लावलेली वाहने, वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणाऱ्या वाहनांवर नियंत्रण आणण्यासाठी टोईंग व्हॅनचा वापर केला जातो.



शहरात कोंडी होत असून शहरातील कर्नाळा सर्कल, टपाल नाका, एमजी रोड, भाजी मार्केट, जुने तहसील कार्यालय, कोहिनूर टेक्निकल आदी ठिकाणी कोंडी होते आहे. विशेष म्हणजे वाहतूक कोंडी सोडविण्याऐवजी वाहतूक पोलीस एकाच ठिकाणी पाच ते सहा जण गर्दी करून थांबत असल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे. याबाबत पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# ज्येष्ठ मालवणी अभिनेते लवराज कांबळी यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मालवण रेवंडी गावचे सुपुत्र, ज्येष्ठ नाट्यनिर्माते आणि प्रसिद्ध अभिनेते लवराज कांबळी यांचे मंगळवारी (दि.२६) अल्पशा आजाराने मुंबईत त्यांचे निधन झाले. ते उत्कृष्ट कला दिग्दर्शकही होते.

'मालवणी नटसम्राट' म्हणून लवराज कांबळी यांची ओळख होती. मच्छिंद्र कांबळींच्या 'वस्त्रहरण' नाटकातील त्यांनी



साकारलेली भोप्याची भूमिका अजरामर ठरली. प्रेमळ, साधे राहणीमान आणि मनमिळाऊ स्वभाव अशी लवराज कांबळींची ओळख होती. लव आणि अंकुश कांबळी या जोडीने ८०-९०च्या दशकात गिरणगावात त्यांच्या कलेच्या माध्यमातून चांगलीच ओळख प्रस्थापित केली.

मालवणी भाषा आणि नाटके गावाखेड्यांत पोहचवण्याचे महत्त्वाचे काम लवराज कांबळी यांनी केले. मालवणी नाटकांतील एक हिरा गमावला, अशी भावना प्रत्येकाच्या मनात असून सर्वजण त्यांना श्रद्धांजली वाहत आहेत.

### दुखवटा

### सुरेश जैन



**म्हसळा :** तालुक्यातील कापड व्यापारी, म्हसळा तालुका जैन समाज अध्यक्ष, केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय संचालक मंडळाचे सदस्य सुरेश भूरमल जैन (वय ६१) यांचे रविवारी (दि.२४) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा, भाऊ, चार बहिणी, जावई, सुन, नातवंड आणि आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. म्हसळा हिंदू स्मशानभूमीत सोमवारी (दि.२५) दुपारी त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेला सर्व स्तरांतील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# मोहोपाडा बाजारपेठेतील रस्ता रुंदीकरणाची गरज

## रस्त्यातच विक्रेत्यांचे अतिक्रमण; नागरिक हैराण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा परिसराची मुख्य बाजारपेठ असलेल्या मोहोपाडा शहरात दर रविवारी आठवडा बाजार भरत असून रसायनी व आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येते. मोहोपाड्याचे रुपांतर शहरीकरणाकडे झपाट्याने होत आहे. त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याचे रूंदीकरण होणे गरजेचे बानले आहे.

आठवडा बाजाराच्या वेळी छोटे-मोठे व्यावसायिक, भाजीविक्रेते अरूंद रस्त्यावरच आपले बस्तान मांडत असल्याने वाहतूक कोंडी होते. बाजारपेठेतील गर्दीमुळे चालणेही कठीण बनले आहे. त्यामुळे लवकरात लवकर बाजारातील रस्त्याचे रूंदीकरण करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.



रविवारी आठवडा बाजार व सुट्टीचा दिवस असल्याने बाजारपेठ खचाखच भरत असून फळविक्रेते, भाजीविक्रेते रस्त्याच्या कडेलाच बसलेले असतात. त्यातच खरेदीसाठी आलेले ग्राहकही अनेक वेळा आपली वाहने रस्त्याच्या कडेला उभी करीत असल्याने वाहते कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. या बाजारात कापड दुकानांसह अन्य दुकानदार आपले दुकान थाटत आहेत. त्यांना जागेचे नियोजन केल्यास दुकानदारांना सोयीचे होऊन अधिकाधिक दुकानदार आपली दुकाने त्या ठिकाणी थाटू शकतात. यामुळे चांगला बाजार भरल्यास त्याचा लाभ नागरिकांना होऊ शकतो. या बाजारपठेत विविध प्रकारचे कापड दुकान, बांगड्यासह महिलांचे विविध साहित्य, खाद्यपदार्थ, भांडी, शोभेच्या वस्तू आदी व्यापारी आपली दुकाने थाटतात.

आठवडा बाजारातील माल हा स्वस्त मिळत असल्याने परिसरातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात ग्राहकवर्ग खरेदीसाठी येत असतो. या बाजारात कपडे व शोभेच्या वस्तू शहरांतील अन्य दुकांनापेक्षा कमी किमतीत मिळत असल्याने महिलांसह नागरिक आठवड्याचा माल खरेदी करीत असतो.

बाजारातील जागेच्या समस्येची संबंधितांनी दखल घेऊन नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

# पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कराला स्थगिती नाही!

## उच्च न्यायालयाचा याचिकेवर निर्णय




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उच्च न्यायालयात खारघर फोरम यांच्या वतीने पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कराविरोधात जनहित याचिकेवर मंगळवारी (दि.२६) सुनावणी घेण्यात आली. उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्यासमोर झालेल्या सुनावणीमध्ये उच्च न्यायालयाने पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

या सुनावणीमध्ये महापालिकेच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. आशुतोष कुंभकोणी यांच्या समवेत अॅड. केदार दिघे यांनी या याचिकेमध्ये विधीज्ञ म्हणून काम पाहिले.

मालमत्ता कर भरण्यासाठी ३१ मार्च ही शेवटची तारीख असून ज्या मालमत्ताधारकांनी आपले मोबाईल नंबर आपल्या खात्याशी कनेक्ट केले नाहीत, त्यांनी आपले मोबाईल नंबर अपडेट करून घ्यावे जेणेकरून मालमत्ता कराचे बिल प्रत्यक्ष त्याच मालमत्ताधारकाच्या मोबाईलवरती जाईल, तसेच मालमत्ता बिलात किरकोळ दुरूस्त्या असतील तर त्या तातडीने करून घ्याव्यात असेही आवाहन महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे चार दिवस राहिल्याने शनिवार व रविवार कार्यालये नागरिकांसाठी खुली ठेवण्यात येणार आहे. उच्च न्यायालयाने कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नसल्याने तसेच पुढील वर्षाची दोन टक्के शास्ती वाचविण्यासाठी मालमत्ताधारकांनी ३१ मार्चपूर्वी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

सध्या १७ वसुली पथकांच्या माध्यमातून महापालिका कार्यक्षेत्रात वसुली मोहीम सुरू आहे. मंगळवारी (दि.२६) एका दिवसात सुमारे दोन कोटी ७८ हजाराचा भरणा पालिकेच्या तिजोरीत झाला आहे.

# नाकाबंदी स्पेशल कारवाईत दुचाकीस्वारांकडून दंड वसूल



**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा निवडणूक व सणासुदीच्यानिमित्ताने पनवेल शहर पोलिसांनी केलेल्या नाकाबंदी स्पेशल कारवाईत दुचाकीस्वारांकडून एकूण २१ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्यासह पोलिसांची पथके व वाहतूक शाखेचे पथक आदींच्या वतीने वडाळे तलाव या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती.

नाकाबंदीदरम्यान पोलीस अंमलदार संतोष कोळंबेकर यांनी वडाळे तलाव परिसरातील नंबर प्लेट नसलेले, मूळ सायलेन्सरमध्ये बदल केलेले, वाहन चालविण्याचा परवाना नसलेले, धोकादायकरितीने वाहन चालवणारे दुचाकी (एमएच ४७ बीई २८११), (एमएच ४३ बीजी ०५६९), (एमएच ४६ सीसी ६११८), (एमएच ४६ सीजे ०९४७) या दुचाकी वाहनांना पोलीस ठाणे येथे आणून मोटर कायदा कलमप्रमाणे कारवाई करून एकूण २१ हजार ९०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

या कारवाईमध्ये सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अंबादास कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय धारेराव, पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार दत्तात्रय शिंदे, पोलीस नाईक किरण सोनवणे आदी उपस्थितीत होते.

# फ्लॅटला लागलेल्या आगीत मोठे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील नेरे येथील नीलकमल सोसायटीतील इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅटला आग लागली. यात घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

येथील महालक्ष्मीनगर नीलकमल सोसायटीच्या सेक्टर २, या ठिकाणच्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅटला आग लागल्याची घटना घडली. याबाबतची माहिती नवीन पनवेल अग्निशामक दलाला देण्यात आली. त्यानंतर अग्निशामक दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी फ्लॅटला लागलेली आग अवघ्या काही वेळात विझवली.

आग लागल्यानंतर घरातील कुटुंबियांना त्वरीत बाहेर काढण्यात आले. त्यामुळे यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशामक दलाच्या जवानांनी घरातील सिलिंडरदेखील बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.



# शिवजयंती शांततेत पार पाडण्याचे उरण पोलिसांचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

संपूर्ण हिंदुस्थानचे आराध्यदैवत मानले जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे साजरी करण्यात येणारी शिवजयंती उत्सव व पालखी मिरवणूक यंदा लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमध्ये आली आहे. त्यामुळे आचारसंहितेचे नियम पाळूनच गुरुवारी (दि.२८) शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश निकम यांनी नागरिकांना केले आहे.



या वेळी हिंदू-मुस्लिम जातीय सलोखा जपण्यासाठी नेहमीप्रमाणे पुढे येऊन सर्वांना योग्य ते सहकार्य करावे जेणेकरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याची दक्षता घ्यावी. श्री छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मिरवणूक काढताना कोणत्याही धार्मियांची मने दुखू नये यासाठीही सहकार्य करण्याचे आवाहनही निकम यांनी केले असून, याबाबतची महत्त्वपूर्ण बैठक उरण पोलीस ठाण्यात बोलावण्यात आली होती.

या बैठकीत उरण शहर व तालुक्यातील सर्वधर्मिय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती. या वेळी उरण शहर व तालुक्यातील गावागावांत शिवरायांची पालखी मिरवणूक कशाप्रकारे काढण्यात यावी, याबाबत तालुक्यातील व शहरातील उपस्थितांची मते विचारात घेऊन, त्यावर योग्य निर्णय घेण्यात आल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. या वेळी या बैठकीसाठी नरेश रहाळकर, संदेश ठाकूर, प्रशांत म्हात्रे, भूपेंद्र घरत, विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये पदवी प्रदान समारंभ उत्साहात






**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल (सीबीएसई)मधील पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी पदवीप्रदान समारंभ शुक्रवारी (दि.२२) आयोजित करण्यात आला होता.

पदवीप्रदान समारंभ हा लहानग्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या आयुष्यातील सर्वांत आनंदाचा क्षण असतो. पदवीदानानंतर त्यांचा पूर्व प्राथमिक विभागातील सहभाग संपून ते प्राथमिक विभागाचा भाग होण्यास पात्र होतात. कार्यक्रमाच्या आरंभी प्रमुख पाहुणे लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल अॅड ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, पीटीए सभासद मिलिंद जाधव, पालक संजीव दास, समन्वयक नेहा खन्ना, शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, समन्वयक अर्चना माथुर आणि सोनाली पवार यांच्या हस्ते दीप्रज्वलन करण्यात आले.

सीबीएसई प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. नंतर या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या वेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रंगीबेरंगी पोशाख परिधान करून सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि उपस्थितांची मने जिंकली. सिनियर केजीच्या या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पदवीधर वेशभूषा करून पदवीचा स्वीकार केला.

आयुष्यातील पहिली पदवी घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसून येत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा शेंडे आणि कॅरेन मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना माथुर यांनी केले. हा समारंभ सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.



**उरण : होळीनंतर धुळवड सोमवारी उत्साहात साजरी झाली. पूनम योगा ग्रुपच्या महिला सदस्यांनी एकमेकींना रंग लावत धुलिवंदननिमित्त जल्लोष केला.**

# नवीन पनवेलमध्ये दुर्मिळ नाणी, स्टॅम्पचे प्रदर्शन

**खारघर : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे होलिकोत्सवाच्या निमित्ताने कृष्णा गार्डन सोसायटी नवीन पनवेल येथे दुर्मिळ नाणी आणि स्टॅम्प यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ज्येष्ठ लायन सभासद यशवंत ठाकरे आणि बंसिधर गैरोला यांचे हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

इतिहास संशोधक विजय मनोहर यांनी संग्रह केलेली ६०० पेक्षा जास्त दुर्मिळ नाणी आणि १००० पेक्षा जास्त तिकिटे यावेळी प्रदर्शित करण्यात आली होती, तसेच विविध समुद्र किनाऱ्यावरील वाळूचे नमुनेसुद्धा या वेळी मांडण्यात आले होते. दोन जवळच्या समुद्रकिनाऱ्यावरील वाळूमध्ये दिसणारा फरक दाखविण्यात आला. हे प्रदर्शन यशस्वी करण्यात विजय मनोहर यांना मेधा मनोहर, महेश भिसे, सरगम क्लबच्या अध्यक्षा स्वाती गोडसे, मानदा पंडित, प्रेमेंद्र बहिरा, संजय गोडसे, सुयोग पेंडसे यांनी सहकार्य केले.



## संपादकीय

# तुरूंगातून कारभार?

दिल्लीचे मुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण प्रकरणात अटक होऊन सहा दिवस झाले तरी ते अजूनही मुख्यमंत्री पदाला चिकटून आहेत. एकीकडे 'आप'चे कार्यकर्ते राजधानी दिल्लीत केजरीवाल यांच्या अटकेच्या विरोधात निदर्शने करीत आहेत, तर त्याचवेळी भारतीय जनता पक्षाने केजरीवाल यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी निदर्शने सुरू केली आहेत. केजरीवाल हे असेच तुरुंगातून सरकार चालवतील की, दिल्लीत नवा मुख्यमंत्री निवडला जाईल हे लवकरच स्पष्ट होईल.

**दिल्लीचे मुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी, २१ मार्च रोजी मद्य धोरण घोटाळ्यात अटक झाली. सध्या ते सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीच्या कोठडीत आहेत, मात्र तिहार तुरूंगात रवानगी होऊनही अद्यापही केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची सोडली नसून उलट त्यानंतरही २४ तारखेला ईडीच्या कोठडीतून मंत्र्यांना पहिला आदेश पाठवून दिल्लीच्या कारभाराची सूत्रे स्वत:च्याच हातात ठेवली असल्याचे भासविण्याचा प्रयत्न केजरीवाल यांनी केला. केजरीवाल यांनी मंत्री आतिशी यांना कोठडीतून आदेश पाठवल्याने नवाच वाद निर्माण झाला आहे. दिल्लीतील मोहल्ला क्लिनिकमध्ये मोफत औषधांचा तुटवडा भासू नये याची काळजी घ्या असे आदेश केजरीवाल यांनी दिल्याचे दिल्लीचे आरोग्यमंत्री सौरभ भारद्वाज यांनी सांगितले होते. दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणात अटक झाल्याबरोबर केजरीवाल यांनी आपण तुरुंगातून सरकार चालवू असा दावा केला होता. केजरीवाल यांनी तुरूंगातून आदेश पाठवल्याची चर्चा सुरू होताच. स्वाभाविकपणे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अधिक आक्रमकपणे केजरीवाल यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. त्याचवेळी केजरीवाल यांनी तुरूंगातून मुख्यमंत्री म्हणून मुख्य सचिवांना आदेश जारी केल्याने या प्रकरणात ईडीनेही लक्ष घातले आहे. अशा तऱ्हेने तुरूंगातून आदेश काढणे कुठल्या कायद्यात बसते याची चौकशी ईडीकडून केली जाणार आहे. ईडी कोर्टाने केजरीवाल यांना २८ तारखेपर्यंत कोर्टात ठेवण्याचे आदेश दिले आहेत. केजरीवाल यांच्या पत्नी सुनिता केजरीवाल आणि खासगी सचिव विभव कुमार यांना केजरीवाल यांना रोज संध्याकाळी अर्धा तास भेटण्याची परवानगी देण्यात आली आहे. उरलेल्या अर्ध्या तासात केजरीवाल आपल्या वकिलांना भेटू शकतात. कोठडीत असलेल्यांना कोणतीही स्टेशनरी वापरण्याची परवानगी नाही. असे असताना केजरीवाल यांनी कोठडीतून ऑर्डर कशा पाठवल्या याची आता चौकशी होणार आहे. सीसीटीव्ही फुटेजही तपासले जाणार आहे. राजधानी नवी दिल्लीमध्ये त्यामुळेच मंगळवार हा जोरदार निदर्शनांचा दिवस ठरला. एकीकडे आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सुटकेसाठी रस्त्यावर उतरले होते, तर भाजपच्या कार्यकर्त्यांनी केजरीवाल यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी निदर्शने केली. लोकसभा निवडणुकीला अवघे २५ दिवस उरलेले असताना दिल्लीतील या घडामोडी अवघ्या देशाचे लक्ष वेधून घेत आहेत. केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर काँग्रेस आणि आप यांच्या युतीचे काय होणार असा प्रश्नही निर्माण झाला आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीमध्ये भारतीय जनता पक्षाला ५६.९ टक्के मते मिळाली होती. 'आप'ला अवघी १८.२ टक्के, तर काँग्रेसला २२.६ टक्के मते मिळाली होती. या दोघांची मिळून मते ४०.८ टक्के होतात, मात्र आता निश्चितच परिस्थिती वेगळी आहे. एकेकाळी भ्रष्टाचारविरोधी आंदोलनामुळे केजरीवाल यांना मोठी लोकप्रियता लाभली होती. त्याच केजरीवालांच्या विश्वासार्हतेला आता मोठा तडा गेला आहे.**

# पनवेल स्टेशनहून नवीन पनवेलसाठी पर्यायी मार्गाची गरज



### खबरबात
नितीन देशमुख

मुंबईचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या पनवेलचे रेल्वेस्थानक महत्त्वपूर्ण मानले जाते. पनवेल रेल्वे स्टेशनवरील नवीन पनवेलकडे जाण्यासाठी असलेलल्या पुलावर जाण्याचा जिना अरुंद आहे. त्यातच स्टेशनवर सुरू असलेल्या कामासाठी फलाटाच्या बाहेरून असलेला पूल बंद आहे. त्यामुळे नवीन पनवेलकडे जाणाऱ्या पुलावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. सकाळ–संध्याकाळी गर्दीच्या वेळी घरी किंवा कामावर जाताना बल्लारशहा, एल्फिस्टन स्टेशन किंवा सीएसटीसारखी दुर्घटना घडू शकते, पण रेल्वे प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे सावधान, नवीन पनवेलकरांनो सावधान!

मध्य रेल्वेचे पनवेल रेल्वे स्टेशन हे मोठे जंक्शन आहे. येथे क्रमांक १ ते ४ फलाटावर लोकल गाड्या, तर क्रमांक ५ ते ७वर लांब पल्ल्याच्या गाड्या येत असतात. फलाट क्रमांक ५ ते ७ हे नवीन पनवेल बाजूला आहेत. पनवेल शहराचा मोठ्या प्रमाणात विकास हा नवीन पनवेल बाजूला झाला आहे. या बाजूला मोठ्या प्रमाणात रहिवासी वसाहती व इंजिनियरिंग व इतर महाविद्यालये असल्याने प्रवाशांची विद्यार्थ्यांची जा–ये असते. या बाजूला जाण्यासाठी सहा फुट रुंदीचा पूल आहे. लोकल थांबल्यावर अनेक जण या पुलावर जाण्यासाठी फलाटावरून धावत जात असतात. त्यातच स्टेशनवर सुरू असलेल्या कामामुळे बाहेरून असलेला पूल बंद करण्यात आला आहे. त्यामुळे पनवेलकडून येणाऱ्यांना ही फलाटावरील पुलाचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे लोकल आल्यास पुलावर मोठी गर्दी होते. लांब पल्ल्याच्या गाडीत बसण्यासाठीही याच पुलाचा वापर करावा लागतो. या पुलावरून रोज लाखो माणसे जात असतात.

हा पूल ८०च्या दशकात बांधला आहे. या पुलाचे नवीन पनवेल बाजूकडून दुसरा आणि तिसरा लोखंडी खांब वरच्या बाजूला पूर्ण सडलेला आहे. या पुलाच्या खाली नवीन रेल्वेमार्गाचे काम सुरू असताना जेसीबी लावून तेथे खड्डे खणताना हादऱ्याने त्याच्या स्ट्रक्चरला धक्के बसले आहेत. पुलाखालून मालगाडी गेल्यावर हादऱ्याने पूल हातो याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. त्याबाबत पनवेल स्टेशन सल्लागार समितीच्या बैठकीत तक्रारही करण्यात आली होती, पण रेल्वे त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे गर्दीच्या वेळी वजन सहन न झाल्याने हा पूल केव्हाही मोडून पडून चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशहा येथील दुर्घटनेसारखी दुर्घटना घडू शकते.



पनवेल जंक्शनमधून नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. त्याचे काम सुरू होते, पण खडक लागल्याने हे काम तीन वर्षांपूर्वी थांबवण्यात आले. सुरुंग न लावता खडक फोडण्याच्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगितले जाते, पण त्याला अद्याप मुहूर्त सापडलेला नाही. त्यामुळे हा पूल कोसळल्यास नवीन पनवेलला येण्यासाठी दुसरा मार्ग उपलब्ध नाही. या पुलाला पर्यायी पूल नसल्याने दुर्घटना घडल्यास रेल्वे लाइन ओलांडून येण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही. याबाबत रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी काही तक्रार केल्यास नवीन बांधकामामध्ये मुंबईच्या दिशेला भुयारी मार्गाची तरतूद असल्याने आता गरज नसल्याचे सांगतात. दुर्घटना घडल्यास नवीन पनवेलमध्ये जाण्यास कोणतीही पर्यायी व्यवस्था या स्टेशनमध्ये नाही. यासाठी रेल्वे प्रशासनाने त्याबाबत दक्षता घेणे गरजेचे आहे.

### याकडे लक्ष देण्याची आवश्यकता
१) तुळई आणि स्तंभाच्या जोडणीच्या ठिकाणी स्तंभामध्ये गंज सुरू झाला आहे.
२) स्तंभ विभागाच्या क्रॉस सेक्शनल क्षेत्रामध्ये घट झाली आहे.
३) गंज वेब आणि लांबीच्या बाजूने फिरत आहे.
४) फ्लँजपैकी एक वेबपासून जवळजवळ विभक्त आहे.
५) जेव्हा एक्स्प्रेस आणि लोकल गाड्या एकाच वेळी येतात तेव्हा पादचारी मोठ्या प्रमाणात येत असल्याने मोठे वजन पूलावर येते
६) अशा वेळी पुलाच्या ताकदीचे हे कमी झालेले गुणधर्म कोणत्याही चेतावणी सिग्नलशिवाय अचानक अपयशी ठरू शकतात.

त्वरित दुरुस्ती किंवा कोणत्याही उपायाने हे टाळले जाऊ शकते असे एका प्रत्यदर्शी अभियंत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.



## बदलते तंत्रज्ञान

# शरीरातील उष्णतेनेही चार्ज होईल तुमचा फोन

अनेकदा कामाच्या घाईगडबडीत बाहेर फिरायला जाताना किंवा ऑफिसला जाताना मोबाईल, लॅपटॉप चार्ज करणं आपण विसरून जातो किंवा राहून जातं. अशा वेळी मोबाईलची बॅटरी डेड होणं, लॅपटॉप स्लो होणं यांसारख्या अनेक समस्यांचा आपल्याला सामना करावा लागतो. पण, आता चिंता करण्याची काही गरज नाही. तसेच, सतत यासाठी लागणारं चार्जर आणि पॉवर बँकसुद्धा बरोबर ठेवण्याची गरज नाही, कारण आता तुमचा मोबाईल, इयरफोन, लॅपटॉप यांसारखे गॅजेट्स आता अगदी सहज चार्ज करता येऊ शकतात.



नुकतंच स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेस, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मंडीच्या संशोधकांसह सहयोगी प्रा. अजय सोनी यांच्या नेतृत्वाखाली थर्मोइलेक्ट्रिक मॉड्यूल विकसित करण्यात आलं आहे. हे मॉड्यूल मानवी स्पर्शानेच चार्जिंग सुरु करू शकेल. याच्या मदतीने कोणत्याही इलेक्ट्रॉनिक गॅझेटची बॅटरी अगदी सहज चार्ज करता येऊ शकते. अशी कमी ऊर्जा वापरणारी इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स केवळ तुमच्या शरीरातील उष्णता चार्ज केली जाऊ शकतात.

**थर्मोइलेक्ट्रिक मॉड्यूलची किंमत किती?**

हे संशोधन जर्मन केमिकल सोसायटीच्या जर्नल अँजेवांडटे केमीमध्ये प्रकाशित करण्यात आलं आहे. या थर्मोइलेक्ट्रिक मॉड्यूलची किंमत २०० ते ५०० रुपयांदरम्यान असेल. माणसाला ते घड्याळाच्या पट्ट्याप्रमाणे त्याच्या मनगटावर घालावे लागेल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या डिव्हाईसला चार्ज करण्यासाठी मानवी शरीराच्या ऊर्जेशिवाय इतर कोणत्याही साधनाची गरज भासणार नाही.

थर्मोइलेक्ट्रिक मॉड्यूलसह इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट चार्ज करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या वायरची गरज भासणार नाही. गॅझेटमध्ये एक लहान डिव्हाईस सेट केलेलं असणार आहे. तसेच, हे मॉड्यूल हात, मांडीवर किंवा खिशात धरल्यावर थर्मोइलेक्ट्रिक मॉड्यूलद्वारे गॅझेट चार्ज करता येऊ शकतात.

सिल्व्हर टेल्युराईड नॅनोवायर मानवी शरीरातून बाहेर पडणाऱ्या ऊर्जेचे म्हणजेच उष्णतेचे विजेमध्ये रूपांतर करण्याचे काम करेल. या तंत्रज्ञानामुळे विजेची बचतही होणार आहे. लोकांना पॉवर बँक घेण्यासाठी पैसे खर्च करावे लागणार नाहीत. तसेच चार्जर आणि पॉवर बँकच्या वापराने तुम्हाला चिंताही करण्याची गरज भासणार नाही.

# अभिनेते व गायक भार्गवराम आचरेकर



### निमित्त

मराठी संगीत रंगभूमीवरील गायक–नट म्हणून गाजलेल्या भार्गवराम भिकाजी आचरेकरांचा जन्म कोकणातील मालवण तालुक्यातील आचरे या गावी झाला. भार्गवरामांचा १९२५च्या आसपास ललित कलादर्शमध्ये प्रवेश झाला. या कंपनीत त्यांचे संगीत व अभिनयाचे शिक्षण सुरू झाले. सुरुवातीला ते छोट्या–मोठ्या स्त्री–भूमिका व इतर कामेही करत. ललितकलादर्शच्या अनेक नाटकांतून त्यांनी कामे केली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी लेख..

भार्गवराम यांनी ललितकलेत बारा वर्षे काढली. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा', 'पुण्यप्रभाव', 'कृष्णार्जुन युद्ध', 'शिक्का कट्यार', 'सोन्याचा कळस', 'वधूपरीक्षा' इत्यादी ललितकलादर्शच्या नाटकांतून त्यांनी विविध भूमिका केल्या. त्यांना १९३७ साली कंपनीच्या दुरवस्थेमुळे पेंढारकरांनीच गावी जायला सांगितले. त्यांनी १९४०–४१ च्या सुमारास स्वत:ची 'ललितकला संवर्धक' ही कंपनी काढली. भार्गवरामांनी या कंपनीच्या 'संगीत सौभद्र'(कृष्ण), 'मानापमान' (धैर्यधर), 'पुण्यप्रभाव' (भूपाल) या नाटकांतून पुरुष–भूमिकाही समर्थपणे साकारल्या. आर्थिक जम न बसल्यामुळे ही कंपनीही बंद करावी लागली.

पुढे गंगाधरपंत लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीच्या नाटकांतूनही त्यांनी भूमिका केल्या. त्यांच्या 'विद्याहरण' या नाटकातील कच, 'प्रेमसंन्यास'मधील जयंत, 'सौभद्र'मधील अर्जुन या भूमिका विशेष गाजल्या. याच दरम्यान भार्गवराम विवाहबद्ध झाले व पुण्यात स्थायिक झाले. दामुअण्णा मालवणकरांच्या 'प्रभाकर नाट्यमंदिर', तसेच 'भारत नाट्यकला' या काही नाट्यसंस्थांतूनही भार्गवरामांनी काम केले. भार्गवरामांनी जुन्या नाटकांबरोबरच 'लग्नाची बेडी' (पराग), 'उसना नवरा' (गिरीश) अशा काही नव्या नाटकांमधूनही भूमिका केल्या.

नाटकाबरोबरच शास्त्रीय संगीताच्या बैठका, गायनाच्या शिकवण्या, आकाशवाणीवरील कार्यक्रम असे उपक्रम चालू होते. जुन्या नाटकांचा जमाना संपत आला होता. नव्या संगीत नाटकांचे युग सुरू झाले. 'नाट्यसंपदा'चे १९६७ साली 'कट्यार काळजात घुसली' हे संगीत नाटक आले. या नाटकाद्वारे भार्गवराम आचरेकरांचे वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी संगीत रंगभूमीवर पुनरागमन झाले. या नाटकात त्यांनी पं. भानुप्रसादचे काम केले. अतिशय छोटी भूमिका असली तरी भार्गवरामांचे काम आणि गाणे प्रेक्षकांच्या मनावर ठसले. या नाटकातील 'दिन गेले भजनावीण' हे पद व यमनमधील 'तराण्यां'तून त्यांच्या गाण्याचा कस दिसतो. 'कट्यार'च्या जवळजवळ ५०० प्रयोगांतून त्यांनी काम केले. ललितकलादर्शच्या हीरक महोत्सवी वर्षात १९६८ साली 'सौभद्र' या नाटकातून त्यांनी श्रीकृष्णाची भूमिका साकारली होती.

भार्गवरावांचा आवाज वजनदार व गाणे कसदार होते. ते सातत्याने गायनाची मेहनत करत. त्यांच्या शिष्यवर्गात अविनाश आगाशे यांचे प्रमुख नाव घ्यावे लागेल. ते बरीच वर्षे त्यांच्याकडे शिकले. याशिवाय मुकुंद उपासनी, मुकुंद मराठे यांनाही त्यांची तालीम मिळाली. अनेकांना नाट्यसंगीताचे, तसेच गायनाचे मार्गदर्शन लाभले.

भार्गवरावांना १९८३ साली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे त्यांचा सन्मान करून पुरस्कार देण्यात आला. पुणे महानगरपालिकेतर्फे 'बालगंधर्व' पुरस्कार (१९९६); अखिल महाराष्ट्र नाट्य परिषद, सांगलीतर्फे पुरस्कार (१९८९); याशिवाय मराठी रंगभूमी, पुणे; कालनिर्णय, मुंबई व अण्णा कराळे पुरस्कृत 'संगीत सूर्य केशवराव भोसले' पुरस्कार आदी पुरस्कारांचे ते मानकरी होते. वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी पुण्यात त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)


### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : सध्या कडक ऊन पडत असल्याने मसाला बनविण्यासाठी मिरच्या, हळद उन्हामध्ये वाळवली जात आहे.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात 'या' फळांनी कोलेस्ट्रॉल नियंत्रणात



सध्याच्या काळात कोलेस्ट्रॉलची समस्या फक्त वृद्धांमध्येच नाही तर तरुणांमध्येदेखील दिसून येते. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी काय करावं? काय खावं? असे प्रश्न अनेकांना पडतात तसेच आता उन्हाळादेखील सुरू होत आहे. त्यामुळे या काळात कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी तुम्ही काही फळांचे सेवन करू शकता.

कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी लिंबू, संत्रे आणि द्राक्षासारखे आंबट–गोड फळे उत्तम उपाय आहेत. आंबट–गोड फळांमध्ये हेस्परिडिन असते, जे हाय ब्लड प्रेशर कमी करण्यास मदत करते. शिवाय या फळांमुळे प्रतिकारशक्ती वाढवण्यासही मदत होते.

**पपई :** फायबरयुक्त असलेली पपई ब्लड प्रेशर नियंत्रित ठेवण्यात मदत करते आणि रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करते. पपई पचनसंस्था व्यवस्थित ठेवण्यास मदत करते. उन्हाळ्यात खासकरून पपईचे सेवन केले पाहिजे.

**सफरचंद :** सफरचंद एक सुपरफ्रूट असल्याचे म्हटले जाते. दररोज एक सफरचंद खाल्ले तर डॉक्टरकडे जाण्याची गरज पडणार नाही. सफरचंद हे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. सफरचंदमध्ये असलेले पेक्टिन फायबर आणि अँटीऑक्सिडेंट पॉलीफेनोल्ससारख्या इतर घटक कोलेस्ट्रॉल पातळी आणि ऑक्सिडेशन कमी करते.

**अॅवोकॅडो :** अॅवोकॅडो हे फळ सर्रास खाल्ले जात नाही. या फळाला बटर फ्रूट म्हणूनही ओळखले जाते, परंतु या फळाचे सेवन फार कमी प्रमाणातच केले जाते, मात्र हे फळ आरोग्यासाठी खूप लाभदायक आहे. अॅवोकॅडोमध्ये बीटा–सिटोस्टेरॉल आढळून येते. हे फळ कोलेस्ट्रॉल पातळी स्थिर करण्यासाठी फार फायदेशीर आहे.

**टोमॅटो :** टोमॅटो उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल असलेल्या व्यक्तीला टोमॅटोचे सेवन करणे खूप फायदेशीर आहे. टोमॅटोमधील व्हिटॅमिन आणि कॅल्शिअम ही दोन्ही तत्त्वे हाडांना मजबूत करण्याचे काम करते, तसेच टोमॅटोमधील व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सीडंट हाडातील दोष दूर करण्यात मदत करते.

# रायगडच्या जंगल भागातील पाण्याचे स्त्रोत झाले स्वच्छ!

## वनविभागाच्या पुढाकाराने वन्यजीवांची समस्या दूर

**अलिबाग : प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या दिवसांत सर्वत्र निर्माण होणार्‍या पाणीटंचाईची झळ केवळ माणसांनाच नाही, तर पक्षी-प्राण्यांनाही त्याचा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळेच अनेक वेळा पाण्याच्या शोधात जंगली प्राणी मानवी वस्तीत येतात आणि कोणाची तरी शिकार बनतात. त्यामुळे प्राण्यांना जंगलातच मुबलक पाणी मिळावे यासाठी अलिबाग वनविभागामार्फत पुढाकार घेत जंगलातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत शोधण्यात आले. हे स्त्रोत स्वच्छ करून जंगली प्राण्यांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिल्याने पाण्याची चिंता मिटली आहे. यासाठी परिसरातील प्राणीप्रेमींनी सहकार्य केले.



वाढत्या उन्हाच्या कडक्यामुळे जंगलातील पशु, पक्षांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी पुढाकार घेतला. जंगलभागातील पाणवठे स्वच्छ करून पशु-पक्ष्यांसाठी पाण्याचा स्त्रोत खुला करण्याचे आदेश वनक्षेत्रपाल यांना देण्यात आला. जिल्ह्यात तातडीने त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली.

अलिबासह सुधागड व अन्य तालुक्यांमध्ये वन कर्मचार्‍यांनी स्थानिकांच्या मदतीने पाण्याचे स्त्रोत शोधले. ते स्वच्छ करून जंगलातील प्राण्यांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली.

राहुल पाटील यांच्या संकल्पनेचे जिल्ह्यातून सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून प्राणीप्रेमींनीदेखील या उपक्रमाला पाठिंबा देत पाण्याचे स्त्रोत स्वच्छ करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील जंगलभागातील पशु, पक्ष्यांच्या पाण्याचा प्रश्न आता मिटल्याचे दिसून येत आहे.

**जंगली प्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जंगलातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत शोधून ते स्वच्छ करण्यात आले असून यातून प्राण्यांना पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी कर्मचार्‍यांसह स्थानिकांनीदेखील चांगले सहकार्य केले आहे.**

**-राहुल पाटील,**
**उपवनसंरक्षक, अलिबाग**



**माणगाव : तालुक्यातील जावळी गावातील तरुण युवक-युवतींनी एकत्रित येत रंगाची उधळण करीत धूलिवंदन सण उत्साहात साजरा केला.** (छाया : सलीम शेख)

# काशीद समुद्रकिनारी दोन गाड्या आगीच्या भक्ष्यस्थानी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रकिनारी दोन चारचाकी गाड्यांना आग लागून दोन्ही गाड्या आगीत भस्मसात झाल्या. यामुळे गाडी मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.



काशीद समुद्रकिनारी सौरभ राजेंद्र बाथम यांच्या मालकीची मर्सिडीज सिएल्सी ३५० (एमएच१४ सिसी ७६८१) या गाडीला शॉकसर्किट होऊन गाडीला अचानक आग लागली. या गाडीच्या अगदी शेजारी प्रमोद धनाजी गांजळे (रा. वाशी, नवी मुंबई) यांची टोयोटा (एमएच १४ डिटी ५२४४) या गाडीनेही पेट घेतला.

ही घटना सोमवारी (दि.२५) रात्री ८ वजता घडली. त्यामुळे समुद्रकिनार्‍यावरील सर्व स्टॉलसुद्धा बंद करण्यात आले होते. त्यामुळे किनार्‍यावर कोणीच नव्हते. दोन्ही गाड्या आगीत जळून खाक झाल्याने गाडी मालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबतची फिर्याद मुरूड पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भिंगार, तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. नथु बाळू उर्फ पदू पाटील, राहणारः भिंगार, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे भिंगार, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र पोटखराबा हे. आर. प्रती | एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| १७२ | १ | ०-२९-३० | ०-००-८० | ०-३०-१० | ६.६२ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विघमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २६/०३/२०२४**

**कार्यालयीन पत्ता**
**बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए, एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)

# मुरूडच्या मुख्य रस्त्यावर झाड पडल्याने वाहतूक ठप्प

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-मुंबई या मुख्य रस्त्यावर नवाबाच्या राजवाड्यानजीक मंगळवारी (दि.२६) पहाटे ५ वाजता मुख्य वळणावर महाकाय वडाचे झाड पडल्यामुळे वाहतूक दोन ते तीन तासांसाठी ठप्प झाली होती. मुंबईकडे जाणारा हा मुख्य रस्ता असल्याने वाहनांची मोठी रांग लागली होती.

पहाटेची वेळ असल्याने मदतकार्यास थोडा विलंब झाला, परंतु तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक निशा जाधव, सार्वजनिक बांधकाम खाते यांनी तातडीने मदतकार्यास सुरुवात करण्यात आली.

जेसीबीने हे झाड हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु हे वडाचे झाड हे खूप मोठे असल्याने सर्पमित्र संदीप घरत यांनी झाड कापण्यासाठी कटर मशीनचा उपयोग करून झाड कापण्यात आले. त्यानंतर जेसीबीने हे झाड रस्त्यापासून दूर करून रस्ता मोकळा करण्यात आला.



# आदिवासी व गरिबांची होळी झाली गोड

## पालीतून सहाशेहून अधिक पोळ्यांचे संकलन

**सुधागड : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील 'होळी करू लहान, पोळी करू दान' असे आवाहन महाराष्ट्र अंनिसने केले होते. त्यानुसार पालीतील नागरिक तसेच महा. अंनिस पाली-सुधागड शाखेचे पदाधिकारी यांनी रविवारी (दि.२४) रात्री नगरपंचायत हद्दीतील होळ्यांवरून जवळपास सहाशेहून अधिक पोळ्या संकलित केल्या आणि सोमवारी (दि.२५) या पोळ्या आदिवासी वाड्या-पाड्यांवर वाटून आदिवासी व गरिबांची होळी गोड करण्यात आली.



पालीतील सर्व आळयांमधील तसेच झाप, बुरमाळी या गावांमधील होळ्यांवरुन पोळ्या दान करण्यात आल्या. अंनिस कार्यकर्ते व नागरिकांनी सुधागड तालुक्यातील दापोडे व तळई या आदिवासीवाडी आणि टेंबी वसाहतीमध्ये या पोळ्या वाटून आदिवासी अबालवृद्धांचे तोंड गोड केले. या वेळी पाली अंनिस शाखेचे अमित निंबाळकर, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय सावंत, मयूर थळे व रोशन रुईकर आदी तरूण सहभागी होते.

## जाहिर समन्स

SUMMONS FOR FILING WRITTEN STATEMENT UNDER ORDER 5 SUB RULE I PROVISO READ WITH ORDER 8 RULE | PROVISO OF THE CODE OF CIVIL PROCEDURE (AMENDED)2002
SUMMONS FOR FILING WRITTEN STATEMENT
**In The Court of (P.D.J.) Motor Accident Claims Tribunal,BEED.**

EXH. NO. -----

M.A.C.P. No.410/2022
Satish
VERSUS
Govindrao & others

To,
1. Govindrao Sahebrao Pakhare, Age- Major, Occu- Owner, R/o. 402 Saileela CHS plot-277, Kamothe, Behind State Bank of India, Panvel, Raigad-410206

WHEREAS Applicant Satish s/o. Govind Nagargoje, have instituted Motor Accident Claim petition against you, you are therefore, informed to appear in this Tribunal in person, or by advocate, or pleader duly instructed and able to answer all material questions relating to the Motor Accident Claim Petition on 06/05/2024 at 11.00 A.M. To Answer the claim petition and further you are, hereby directed to file on that day a written statement in your defence or to file the written statement within one month from the date of service of this summons in your defence and to produce on the aforesaid day, date & time, all the documents in your possession or power. Upon which you base your defence or claim for set- off or counter claim or where you rely on any other documents whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter claim. You shall enter such documents in list to be annexed to the written statement.

The documents filed by claimant petitioner are enclosed herewith to put your defence.

Whereas, the written statement in your defence is to be filed within 30 days from the date of service of this summons.

Whereas, take notice that in default of your appearance on the aforesaid day, date and time, the claim petition will be heard and disposed of in your absence.

DATED THIS 26th DAY OF THE MONTH OF .03... OF THE YEAR TWO THOUSAND TWENTI FOUR.

Given under my hand and seal of this court

Court Stamp

By Order,
**sd/-**
Asst. Superintendent
Dist. Court Beed.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार

## महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील खर्डी गावात राहणार्‍या एका अल्पवयीन मुलीवर शेजारीच राहत असलेल्या एका तरुणाने जबरदस्ती करीत बलात्कार केला. आरोपीवर महाड तालुका पोलीस ठाण्यामध्ये बालकांचा लैंगिक संरक्षण अधिनियम अंतर्गत तसेच बलात्काराचादेखील गुन्हा दाखल झाला आहे. खर्डी गावात राहणार्‍या एका अल्पवयीन मुलीवर एकतर्फी प्रेम करणारा सचिन मदन सुतार (पंदेरकर) हा त्रास देत होता. २२ मार्च रोजी आरोपी सचिन सुतार याने मुलगी अंघोळ करून किचनमध्ये आली असता, घरात घुसून तिचे तोंड दाबून जबरदस्ती करीत बलात्कार केला. तिने केलेल्या तक्रारीनुसार सचिन मदन सुतार याच्यावर बलात्काराचा तसेच पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. महाड तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. पी. गायकवाड हे अधिक तपास करीत आहेत.




## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030807** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-76/ 2023-2024.** RFx e-tender for work of providing and fixing of 200W LED Floodlights IP 65 on existing high mast towers for yard lighting at various Substation under EHV (O&M) Division Panvel**....2nd call.** **Tender amount Rs. 10,51,012/-,** **EMD amount Rs. 10,510/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.03.2024, 18:00 Hrs. to 03.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030775** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-74/ 2023-2024.** RFx e-tender for work of replacement of existing 6 Nos. 220kV post insulator structure at 220kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel**...2nd call.** **Tender amount Rs. 1,82,375/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.03.2024, 18:00 Hrs. to 03.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030771** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-20/2024 - 2025.** RFx e-tender for Providing the services of LDC cum Computer Typist and Peon at various sections under EHV (O&M) Dn. Panvel for FY 2024-25**....2nd call** **Tender amount Rs. 44,12,688/-, EMD amount Rs. 44,127/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.03.2024, 18:00 Hrs. to 03.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# निवडक



## रिक्षा संघटनेतर्फे आर्थिक सहाय्य

**उरण** : शहरातील द्रोणागिरी माऊली रिक्षा चालक-मालक संघटनेचे सदस्य सुनील पाटील यांचे निधन झाले. त्यांच्या परिवारास संघटनेतर्फे आर्थिक सहाय्य १० हजार रुपये देण्यात आले. मृत्यूनंतर प्रत्येक सदस्य रिक्षाचालकास आर्थिक सहाय्य दहा हजार रुपये दिले जातात. गेल्या २५ वर्षांपासून हा उपक्रम सुरू आहे, असे अध्यक्ष किशोर पाटील यांनी सांगितले. या वेळी उपाध्यक्ष अजय धोत्रे, चिटणीस श्याम घरत, कार्याध्यक्ष जयराज म्हात्रे, सल्लागार रमेश ठाकूर, दीपक म्हात्रे, महेंद्र घरत, के. के. म्हात्रे, गंगाधर पाटील, पांडुरंग भोईर, विलास म्हात्रे, कैलास म्हात्रे, मयूर ठाकूर, नरेंद्र म्हात्रे, भरत म्हात्रे, तुलसीदास पाटील आदी सदस्य उपस्थित होते. आर्थिक सहाय्याबद्दल पाटील कुटुंबियांनी द्रोणागिरी माऊली रिक्षा संघटनेचे आभार मानले.

## कोपरखैरणेत गांजा विक्रेत्यास अटक


**नवी मुंबई** : कोपरखैरणे पोलीस ठाणे हद्दीत अमली पदार्थविरोधी कारवाईचा धडाका वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी सुरूच ठेवला असून ही कारवाई आणखी प्रखर करण्यात आली आहे. त्यानुसार संतोष आव्हाड हे पायी गस्त घालत असताना कोपरखैरणे सेक्टर ५ ते ८च्या गार्डन परिसरात तिघे जण संशयास्पदरित्या आढळल्याने आव्हाड यांनी त्यांना हटकले. त्यानंतर त्यातील दोघांनी तेथून पळ काढला, तर मनीष धोंडिबा शेलार (वय २०) याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली. त्याच्याजवळून तीन हजार रुपयांचा गांजा व सुरा मिळाल्याने त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट तसेच आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा नोंद करून त्यास अटक करण्यात आली आहे.

## नवी मुंबईत आज पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेचे भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र आणि मोरबे धरण ते दिघा मुख्य जलवाहिनीवर देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे बुधवारी (दि.२७) संध्याकाळी नवी मुंबई महापालिका क्षेत्र, कामोठे आणि खारघर नोडमधील पाणीपुरवठा बंद करण्यात येणार आहे तसेच गुरुवारी (दि.२८) कमी दाबाने पाणीपुरवठा होईल. त्या अनुषंगाने या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेल रेल्वेस्थानकातून वृद्ध बेपत्ता

**पनवेल** : नातेवाईकांसोबत बेलापूर ते पनवेल असा प्रवास करून पनवेल स्थानकात फलाट क्र.०६ वर



बाकड्यावर बसवले असता वृद्ध बाथरुमला जाऊन येतो असे सांगून गेले ते अद्याप न परतल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. या व्यक्तीचे नाव मारुती लक्ष्मण सावंत (वय ७५, रा. आंबेवाडी, ता. रोहा) असून त्यांची उंची पाच फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, अंगात पांढऱ्या रंगाचा चौकडीचा फुल बाह्यांचा शर्ट व ग्रे रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे. या वृद्धाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलस ठाणे (२७४६७१२२) किंवा मपोह बोराटे यांच्याशी (९८२१४२५४०४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लूटमार करणाऱ्या टोळीतील एकजण जेरबंद

## २.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त; आणखी आठ गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

बँकेमधून रोख रक्कम काढणाऱ्या लोकांवर पाळत ठेवून लुटणाऱ्या तसेच कारची काच तोडून कारमधील रोख रक्कम चोरणाऱ्या टोळीतील एकाला गुन्हे शाखा कक्ष ३च्या पथकाने अटक केली आहे. प्रवीण राजू गोगुला (वय २३) असे या चोरट्याचे नाव असून त्याने त्याच्या इतर साथीदारांसह वेगवेगळ्या भागात केलेले आठ गुन्हे उघडकीस आले आहेत तसेच त्याच्याकडून या गुन्ह्यातील एकूण २.८३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे.

तळोजा भागामध्ये एका व्यक्तीची दोन लाखांची रोख रक्कम अशाच पद्धतीने चोरी झाल्याची घटना घडली होती. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरूद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला होता. या तपासादरम्यान गुन्ह्यात आंध्र प्रदेश येथील नेल्लोर जिल्ह्यातील सराईत आंतरराज्य टोळी सक्रिय असल्याचे तसेच टोळी बँकेसमोर रेकी करतानाच रक्कम काढून बाहेर आलेल्या ग्राहकांना लुटत असल्याची माहिती गुन्हे शाखेला प्राप्त झाली. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष ३च्या पथकाने प्रवीण राजू गोगुला (२३) याची माहिती काढून त्याला पुण्यातील दौंड येथून ताब्यात घेतले. गुन्हे शाखेने त्याची चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदारांसह नवी मुंबई, ठाणे आणि इतर ठिकाणी आठ गुन्हे केल्याची कबुली दिली, तसेच त्याच्याकडून वापरण्यात आलेल्या दोन युनिकॉर्न दुचाकी असा एकूण २.८३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या टोळीने तळोजा, कळंबोली, खारघर, पनवेल शहर, मानपाडा आदी भागात आठ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याव्यतिरिक्त अटक आरोपीने ठाणे, शिर्डी, फलटण येथे गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी आणि त्यांच्या पथकाने केली.

**एकूण १७ गुन्हे दाखल**

या टोळीवर आंध्र प्रदेशमध्ये मचेला टाऊन, विनुकोडा, मरकापूर टाऊन पोलीस ठाणे तसेच शिरुर, भोसरी, सहकारनगर, शिक्रापूर, कोथरुड, विमानतळ पोलीस ठाणे येथे चोरी, जबरी चोरीचे एकूण १७ गुन्हे दाखल आहेत.

# मद्यप्राशन करून नियमांची पायमल्ली

## कोपरखैरणे पोलिसांची ५० जणांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात होळी रंगपंचमी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, मात्र अनेक ठिकाणी उघड्यावर दारू विकणाऱ्यांचे अड्डे आणि अनेक ठिकाणी मद्यप्राशन करून धिंगाणा घालणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण पहायला मिळते. यांना लगाम घालण्यासाठी कोपरखैरणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी कोपरखैरणे परिसरातील ५०पेक्षा जास्त व्यक्तींवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

होळी आणि रंगपंचमीला व्यसनांचे प्रमाण अधिक पहायला मिळते. त्यात दारू पिऊन धिंगाणा घालणे, आपापसात शिवीगाळ करणे, आणी मग त्यातून नको त्या घटना घडत असतात. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करून शांतता भंग करणाऱ्या व्यक्तींवर कोपरखैरणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी कारवाई केल्यामुळे आजूबाजूच्या क्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणी दारू विकणाऱ्या व्यक्तींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोपरखैरणे परिसरातील ५०पेक्षा जास्त व्यक्तींवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.




# फ्लेमिंगो सिटीची संकल्पना जपावी

## पर्यावरणवादी संस्थांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

आयएएस अधिकारी कैलास शिंदे यांची सिडकोतून नवी मुंबई महानगरपालिकेत आयुक्त म्हणून बदली झाल्याने पर्यावरणवाद्यांनी त्यांच्याकडे फ्लेमिंगो सिटीची संकल्पना नष्ट होणार नाही याची काळजी घेण्याची मागणी केली आहे.

नवीन आयुक्तांची भेट घेऊन, नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी फ्लेमिंगो गंतव्यस्थान, म्हणजे पाणथळ जागा संरक्षित करण्याच्या मनपाच्या पूर्वीच्या वचनाची आठवण करून दिली. कुमार म्हणाले, नवी मुंबईला फ्लेमिंगो सिटीचे नाव देण्यासाठी नॅटकनेक्टने सर्वप्रथम मनपाला सुचविले आणि नंतर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहले. त्यानंतर मनपाने स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत टॅगला परवानगी देण्यासाठी केंद्रीय शहरी विकास



मंत्रालयाला पत्र लिहिले.

पर्यावरणवाद्यांनी मनपाला डीपीएस फ्लेमिंगो तलाव जतन करण्याची विनंती केली होती जी उच्च न्यायालयाच्या निकालानेदेखील संरक्षित आहे. तत्कालीन आयुक्त अभिजित बांगर यांनी सिडकोला विनंती केली होती की, ते एक प्रमुख फ्लेमिंगो गंतव्यस्थान असल्याने तलावाची देखरेख करण्यासाठी मनपाला परवानगी द्यावी. मोकळ्या जागांच्या संदर्भात, कुमार यांनी निदर्शनास आणून दिले की २३२ उद्याने आणि ९१ क्रीडांगणे असूनही, मनपा क्षेत्रातील मोकळी जागा दयनीय आहे. तीन चौरस मीटर प्रति व्यक्ती आहे, कारण ती जागतिक आरोग्य संघटना आणि अमृत (अटल मिशन) यांनी ठरवलेल्या निकषांपेक्षा (प्रति व्यक्ती नऊ ते १० चौरस मीटर) कमी आहे. एनएमएमसीने सिडकोकडून उर्वरित सर्व मोकळ्या जागा ताब्यात घेऊन त्या ग्रीन झोनमध्ये विकसित कराव्यात, असे कुमार म्हणाले.

# जास्त परताव्याचे आमिष पडले महागात!

## ५२ लाख १३ हजारांची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

सट्टा बाजारात गुंतवणूक आमच्या मार्गदर्शनाखाली करा आणि भरघोस परतावा आणि तेही कमी वेळात अशा आशयाच्या जाहिरातीला बळी पडून एका व्यक्तीने तब्बल ५२ लाख १३ हजार ४३३ रुपये गमावले आहेत. याबाबत सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांनी या प्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा नोंद केला आहे.

प्रवीण शिंदे असे फसवणूक झालेल्या फिर्यादीचे नाव आहे. त्यांनी काही महिन्यांपूर्वी समाज माध्यमात एक जाहिरात वाचली होती त्यानुसार सट्टा बाजारात योग्य ठिकाणी गुंतवणूक केल्यास कमी वेळात मोठा परतावा मिळवून देऊ, असे सांगण्यात आले होते. त्यामुळे प्रवीण यांनी ऑनलाईनच त्यांच्याशी संपर्क साधला व त्यांनी सांगेल ते लिंकद्वारे ॲप डाउनलोड केले आणि पैसे गुंतवणे सुरू केले. परतावा किती मिळाला आणि गुंतवणूक किती केली हे सर्व ॲपवर दिसत असल्याने आणि सुरुवातीला परतावा मिळाल्याने प्रवीणचा विश्वास बसला आणि त्यांनी २ जानेवारी ते २२ फेब्रुवारीदरम्यान दोन लाख १३ हजार ४३३ रुपये गुंतवले, मात्र ॲपमध्ये भरघोस परतावा दिसत असताना बँक खात्यात का दिला जात नाही, असा प्रश्न करीत लवकरात लवकर द्यावा म्हणून तगादा लावला तेव्हा मात्र आरोपींनी संपर्क बंद केला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

या तक्रारीची शहानिशा होताच सायबर पोलिसांनी संबंधित चार जणांवर सायबर फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# विविध उपक्रमांतून क्षयरोगविषयक जागरूकता

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतामधून सन २०२५पर्यंत क्षयरोगाचे दूरीकरण करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने नमुंमपामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात.

यामध्ये नमुंमपा कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच नमुंमपा रुग्णालयांमध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. झोपडपट्टी व अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात पथनाट्य सादर करण्यात आले. याव्यतिरिक्त जनसमुदाय सभा, रुग्ण सभा, कर्मचारी प्रशिक्षण, इ. जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले. तेरणा वैद्यकीय महाविद्यालय व डी.वाय.पाटील वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत पोस्टर्स स्पर्धा, कॉन्फरन्स, पथनाट्य, रुग्णांचे आरोग्य शिक्षण इ. उपक्रम झाले.



# उरणमध्ये जंगलातील आगीमुळे आंब्याची झाडे बाधित

**उरण : रामप्रहर वृत्त**

अनेक नैसर्गिक संकटांवर मात करीत चिरनेरमध्ये आंबा पीक घेतले जात असून याच जंगलात आग लागल्याने शेतकऱ्यांच्या शेकडो आंब्याच्या झाडांची राख झाली आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या झाडांचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

तालुक्यातील जंगल परिसरात अनेक समाजकंटकांकडून आगी लावण्यास सुरुवात केली आहे. अशाच प्रकारची आग चिरनेरच्या डोंगराला लागल्यामुळे आंब्याच्या फळांनी बहरलेली शेकडो झाडे जळाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. या आगीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

तालुक्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. अशा वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि वनविभागाच्या दुर्लक्षामुळे येथील भूमाफियांचा धंदा तेजीत आहे. तालुक्यातील उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास सुरू आहे.

काही व्यावसायिकांनी डोंगर, माळरान परिसराला आगी लावण्यास सुरुवात केली आहे. डोंगरांना आगी लागण्याच्या घटनांमुळे डोंगरात वावरणाऱ्या पशुपक्ष्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

# नवी मुंबईत शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांची रेलचेल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार जयंतीनिमित्त वाशी, तुर्भे, सानपाडा परिसरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवप्रतिष्ठानच्या वतीने वाशीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बुधवारी (दि.२७) शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे गुरुवारी (दि.२८) पहाटे रायगड येथून वाशी येथे शिवज्योत आणण्यात येणार आहे. सकाळी विविध विभागातील शिवप्रेमी वाशी येथे येऊन छत्रपतींना अभिवादन करून येथून शिवज्योत आपापल्या परिसरात नेऊन तेथे कार्यक्रम घेणार आहेत, तसेच या वेळी रायगड येथून आणलेला मातीचा मंगल कलशदेखील त्यांना देण्यात येणार आहे, चौकात विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे, अशी माहिती शिव प्रतिष्ठानचे विठ्ठल



मोरे यांनी दिली.

एपीएमसी मार्केट येथे पुिणेरी ढोल ताशाच्या पथकासह भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती गणेश म्हांगरे यांनी दिली. सानपाडा येथे हुतात्मा बाबू गेनू सैद मैदानात सानपाडा सामजिक संस्थेच्या वतीने शिवजयंती उत्सव होणार आहे. यामध्ये सायंकाळी शिवप्रतिमा पूजन, लाठीकाठी, तलवारबाजी प्रत्यक्षिके, प्रा. प्रदीप कदम यांचे शिवव्याख्यान त्यानंतर स्नेहभोजन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती मिलिंद सुर्यराव यांनी दिली.

शिवबा मित्र मंडळ आणि सानपाडा युवा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सानपाडा गावात शिवसेना शाखेजवळ सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर, शिवप्रतिमा पूजन, सत्यनारायण पूजा, सायंकाळी भव्य मिरवणूक सोहळा आणि महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सोमनाथ वास्कर यांनी दिली.

श्री दत्तगुरु बालगोपाळ उत्सव मंडळ आणि शिवस्वराज्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी सेक्टर १५ येथे शिवप्रतिमा पूजन, महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ, आरोग्य तपासणी, होम मिनिस्टर आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती दर्शन भणगे यांनी दिली.

## दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.

पनवेल जवळील टी पॉईंट ते कळंबोली सर्कलपर्यंत जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील सनसेट पॉईंट ब्रिजवर दुचाकीवरील चालकाने भरधाव वेगात येऊन चंद्रकांत हणमंतराव पट्टन हे पायी चालत जात असताना त्यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक व त्यामागील बसलेला सहकारी जखमी होऊन चंद्रकांत हणमंतराव पट्टन यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. भरधाव वेगात दुचाकी चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# उरण जायंट्स ग्रुपचा पदग्रहण सोहळा

**उरण : बातमीदार**

जायंट्स् ग्रुप ऑफ उरणचा पदग्रहण सोहळा शनिवारी (दि.२३)उरणमधील भोईर गार्डन येथे आयोजित करण्यात आला होता.

या वेळी प्रमुख पाहुणे एनसीएफ उपेंद्र मेनन, ललिता वासन, त्याचबरोबर प्रमुख मान्यवर म्हणून जीटी आनंद राय किणी, एनसीएफ ए. एस. महादेवन अध्यक्ष, एनसीएफइआर सतीश अलगुर, जीटी रोशनलाल मेहता, अध्यक्ष विनायक पै, सेक्रेटरी चेतन ठक्कर आदी उपस्थित होते.

जायंट्सच्या प्रार्थनेनंतर मान्यवरांच्या परिचयानंतर बैठकीची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीस २०२३चे अध्यक्ष विनायक पै यांचे स्वागतपर भाषण झाले. चेतन ठक्कर यांनी २०२३चा वार्षिक अहवाल सादर केला. त्यानंतर नव्याने आलेले जायंट्स् मेंबर्स तृप्ती भोईर, नचिकेत ढेरे, अभिषेक जैन यांना शपथविधी अधिकारी म्हणून युनिट डायरेक्टर फेडरेशन १बी प्रियवंदा तांबोटकर यांच्याकडून सर्व टिमला शपथ देण्यात आली व त्यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर २०२४ नवीन वर्षाच्या जायंट्स् अध्यक्षा संगिता ढेरे यांची नियुक्ती व त्यांचे मोठ्या दिमाखात स्वागत करण्यात येऊन त्यांना पदभार देण्यात आला.

सुत्रसंचालन आनंद ठक्कर यांनी केले, तर चैताली ठक्कर यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जायंट्सचे दक्षता पराडकर, प्रतिभा भालेराव, मनिषा घरत, मोनिका ठक्कर, देवेंद्र पिंपळे, योगेश म्हात्रे, राजेश तलरेजा, सचिन ढेरे आदी सदस्य उपस्थित होते.



## निवडक

### कार्यालये सुरू ठेवण्यास मान्यता

**रायगड** : मार्च महिन्याच्या अखेरीस आवक सुलभरित्या होण्याच्या अनुषंगाने शुक्रवार (दि.२९) गुडफ्रायडे सार्वजनिक सुट्टी व शनिवारी (दि.३०) या दिवशी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व कोषागार, उपकोषागार कार्यालये सुरु ठेवणे व या दिवशी देयके स्वीकारणे व पारित करणे सुरू ठेवण्यास शासन स्तरावरून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसे शासनाचे उपसचिव डॉ.राजेंद्र गाडेकर यांनी कळविले आहे.

### शहिदांना विनम्र अभिवादन

**रायगड** : देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणारे शहीद भगत सिंह, राजगुरू, सुखदेव यांना शहीद दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस शनिवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



# पाटबंधारे विभागाकडून आंदोलनकर्त्यांची भेट

## कालव्याचे पाणी देण्यासाठी काम वेगाने उरकण्याचे आश्वासन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्यासाठी १ एप्रिल रोजी कोलाड येथील धरणात उड्या घेऊन आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिल्याने याची दखल प्रशासनाने घेतली आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन हे काम वेगाने उरकण्याचे पुन्हा आश्वासन दिले आहे.



येथील ग्रामस्थ २०१७पासून कालव्याच्या पाण्यासाठी संघर्ष करीत आहेत, त्यातून कालव्याच्या दुरुस्ती कामाला सुरुवात झाली, पण कालव्याला काही पाणी मिळाले नसल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. दरम्यान, आंदोलनकर्त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे महत्त्वाची दुरुस्ती कामे मार्गी लागली. कालव्याच्या काही भागाला पाणी आल्याने संभे, पाले गावांना त्याचा फायदा झाला, मात्र दूरवर असलेल्या वाशी, लांढर, बोरघर, तळाघर, निवी गावापर्यंत कालव्याचे पाणी आलेच नाही. त्यामुळे या गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. उर्वरित मोजकी कामे मार्गी लागल्यास पाणी पूर्ववत सुरू होईल याकडे आंदोलनकर्ते ग्रामस्थांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

निवडणुकीच्या आचारसंहितेचे कारण देत प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी आत्मदहन आंदोलनकर्ते ग्रामस्थांना नोटीस बजावत मज्जाव केला आहे. आत्महत्या हा भारतीय दंडसंहितेनुसार गुन्हा आहे. तुमच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते, असे पाठवलेल्या नोटीसीत त्यांनी म्हटले आहे; तर कोलाड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद पवार यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांना कालव्याच्या दुरुस्ती कामाबाबत माहिती दिली तसेच त्यांनी याकामाची प्रत्यक्ष पाहणी केली व कामे वेगाने पूर्ण करून पाणी सोडण्याचे पुन्हा आश्वासन दिले आहे.



**पेण : भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व माजी आमदार धैर्यशिल पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, मोरेश्वर म्हात्रे, अंकुश सुटे, प्रल्हाद राणे, प्रवीण चव्हाण आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# आगरी समाजातील प्रतिभावंत युवक-युवतींचा सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या आगरी समाजातील तरुण-तरुणींचा सन्मान आम्ही आगरी युवा ग्रुपकडून करण्यात आला. नुकत्याच जाहीर झालेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झालेला तरुण, आर्मीमध्ये निवड झालेले दोन युवक आणि मेडिकल शिक्षण पूर्ण करणारी युवती अशा चार जणांचा त्यांच्या घरी जाऊन सन्मान करण्यात आला.



कर्जत तालुक्यात आम्ही आगरी ग्रुप कडून तालुक्यातील दहावी, बारावीमधील प्रथम क्रमांकाने यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या तरुणांचा सन्मान करण्यात येत असतो. नुकत्याच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत तालुक्यातील आंबोट गावातील तरुण निलेश कांतीलाल मसणे यांनी लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षेचा अडथळा दूर करीत पोलीस निरीक्षक पदावर निवड झाली आहे. वडील गावाचे पोलीस पाटील असल्याने आपल्या मुलाने पोलीस व्हावे असे वाटत असताना निलेश मसणे हा थेट पोलीस उपनिरीक्षक बनला आहे. निलेशने कोणत्याही अकॅडमीमध्ये न जाता घरीच एमपीएससी परीक्षेची तयारी केली.

याशिवाय नेवाळी गावातील तरुण दर्शन संजय बागडे याची निवड आर्मीमध्ये झाली आहे, तर कोदीवले गावातील बाळाजी प्रकाश राणे या तरुणाचीदेखील आर्मीमध्ये निवड झाली आहे. याशिवाय चांदई गावातील ग्रामस्थ आणि रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती उत्तम कोळंबे यांची कन्या श्रुती हिने मेडिकलचे शिक्षण पूर्ण केले आहे. या सर्वांचा त्यांच्या घरी जाऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी आम्ही आगरी ग्रुपचे सदस्य केशव मुने, मनीषा दळवी, संतोष पेरणे, मनोहर हजारे, सज्ञन गवळी, कैलाश थेर, सुभाष नाईक, हरेश सोनावळे, हेमंत कोंडीलकर, योगेश कांबरी यांच्यासह मिलिंद विरले, अंकुश शेळके, संदीप म्हसकर, विलास डुकरे, किशोर घारे, भगवान जामघरे, संदीप मसणे, संतोष धुळे, अंकुश दुर्गे आदी सदस्य उपस्थित होते.

# कर्जतमध्ये रंगला स्वर्ण शीडी सोहळा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील एका जैन कुटुंबात पणतू जन्माला आला आणि त्या कुटुंबातील आनंद गगनात मावेनासा झाला. जैन धर्मीयांमध्ये अशी सुखद घटना घडली की, पणजी आणि पणतू यांच्यासाठी स्वर्ण शीडी सोहळ्याचे आयोजन केले जाते. हा सोहळा असंख्य कर्जतकरांच्या उपस्थितीत पार पडला.

कर्जतमधील एक व्यापारी कुटुंब रणजीत प्रेमचंद जैन यांचा मुलगा प्रतीक यास पुत्र रत्नाचा लाभ झाला. रणजीत आजोबा झाले, तर त्यांची आई रतनीबाई पणजी झाली. या सुखद घटनेमुळे जैन कुटुंबीयांबरोबरच माहेरचे कुटुंबीयसुद्धा आनंदी झाले. यानिमित्ताने जैन धर्मियांच्या परंपरेनुसार स्वर्ण शीडी सोहळ्याचे आयोजन रॉयल गार्डनच्या खुल्या सभागृहात करण्यात आले होते. या वेळी



सुरुवातीला दिनेश जैन आणि मनोज जैन यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

पणजीची मिरवणूक समारंभाच्या ठिकाणी आणण्यात आली. त्यानंतर नातू प्रतीक जैन, नातसून रितू आणि पणतू अगस्त्य याची मिरवणूक आली. या दोन्ही मिरवणूका वाजत गाजत व नाचत आल्या. व्यासपीठावर सर्व जैन कुटुंबीय व सगे सोयरे यांचे नृत्य झाले. या वेळी प्रतीक जमावत यांनी खास शैलीत संगीताच्या आधारावर समयोचित गीते सादर करून प्रसंगी सुत्रसंचलनात विविध उदाहरणे देऊन सोहळ्यात रंगत आणली. त्यानंतर पणजीला स्वर्ण शिडी देण्यात आली.

या कार्यक्रमास माजी आमदार सुरेश लाड, राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, राजेश लाड, उद्योजक भगवान भोईर, भाई गायकर, विलास थोरवे, भाजपचे किरण ठाकरे, अशोक सावंत, नगरसेवक उमेश गायकवाड, संकेत भासे, मोहन ओसवाल, बळीराम देशमुख, जगदीश ठाकरे, जितेंद्र ओसवाल, यश ओसवाल यांच्यासह शोभा जैन, संगीता जैन, रीना जैन, मदनबाई जैन, जराबीबाई जैन, सखीबाई ओसवाल, प्यारीबाई जैन, फांसिबाई जैन यांच्या सह जेठमल कोठारी, अमृत कोठारी, राजेश कोठारी, किशोर जैन, विशाल ओसवाल, विशेक जैन, कोरस राठोड-ओसवाल आदी उपस्थित होते.

## नवखार येथे घरात चोरी

**रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील नवखार येथे भरदिवसा घरात घुसून चोरी झाली असून याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, नवखार येथे २० व २१ मार्चदरम्यान फिर्यादीची आई घराच्या मागील बाजूस भांडी घासत असताना व वडील शेतात काम करत असताना घराचे दरवाजे उघडे होते. याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटात असलेली रोख रक्कम व अडीच ग्रॅम सोन्याची अंगठी असा एकूण रुपये १७ हजार किमतीचा ऐवज चोरून नेला. तशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# मुरूड, काशिद समुद्रकिनारे पर्यटकांनी गजबजले

**मुरूड : प्रतिनिधी**

होळी रे होळी, पुरणाची पोळी असे म्हणत मुरूड शहरासह गावागावातील होळीवर होळीसह धुळवड उत्सवात साजरा करण्यात आला. दरम्यान सलग सुट्टी आल्याने शेकडो पर्यटक मुरूडव काशिद समुद्राकिनारी येऊन रंगात रंगून गेले.

सकाळपासूनच गजबजणारे रस्ते, गर्दीने फुलणारे नाके असे चित्र होते. दुसरीकडे बाजारपेठा बंद होत्या. वाहनांची रेलचेल तुरळक होती, मात्र या सुन्या रस्त्यांवर होळकरांचे घोळके वावरताना दिसत होते. रंगात लहान मुले, तरुण-तरुणी रंगात न्हाऊन निघाले होते. उत्तर भारतीय समाजाकडून मुरूड भंडारी बोर्डींगजवळ होळी मिलन समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यामध्ये मुरुड शहरातील प्रतिष्ठित नागरिक पर्यटकांनी हजेरी लावून डिजेच्या तालावर ठेका धरला.

मुरुड तालुका हे एक उत्तम पर्यटनस्थळ आहे. त्यात मुरूड शहरात निवांतपणा आणि तेथील समुद्र किनाऱ्यावरील पांढऱ्या शुभ्र वाळुवर फेसाळत येणाऱ्या सागरी लाटा पर्यटकांना नक्कीच खुणावतात. सलग तीन दिवस आलेल्या सुट्ट्यांमुळे शेकडो पर्यटक मुरूड व काशिद समुद्रकिनारी दाखल झाले. सकाळपासून पर्यटकांनी रंगांनी धुळवड साजरी केली, तर कोणी आपल्या गाडीतील स्पिकर लावून नाच करताना व कोणी कबड्डी, किक्रेट खेळताना पहावयास मिळाले.



# रोह्यात धुलिवंदन उत्साहात; सर्वांचा सहभाग

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात होळी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी बालगोपाळांसह नागरिकांनी रंग उडवून धुलिवंदन आनंदात साजरा केला.

रोहा तालुक्यात ज्येष्ठ, तरुण व लहान मुलांनी सामुदायिकपणे होळी रचली. रात्री होळीला अग्नी देण्यात आली. दुसऱ्या दिवशी सोमवार असल्याने अनेकांना धुळवडीचा मांसाहारी जेवणाचा बेत आखता आला नाही, पण रंगांची उधळण करण्यात आली. सकाळपासूनच लहान मुलांनी रंग खेळण्यास सुरुवात केली होती.



धुळवाडीला सोमवार आल्याने कोकणात मोठे महत्त्व असलेला होळी पोस्त साजरा करता आला नाही. होळी पेटविल्यानंतर दुसऱ्या म्हणजे धुलवडीच्या दिवशी ग्रामीण भागात व शहरात सर्वत्र होळीनिमित्त मटणावळीचा पोस्त हा साजरा करण्याची प्रथा आहे. यंदा मात्र धुळवडीचा दिवस सोमवारी आल्याने तिखट सण साजरा करता आला नसल्याने अनेकांचा हिरमोड झाला. शिवाय यानंतर मंगळवार आला. त्यामुळे बुधवारी पोस्त्याच्या मटणावळीवर हात मारीत खऱ्या अर्थाने हा सण कोकणात साजरा होणार आहे.

# धुळवडीला रोह्यात बच्चेकंपनीची धमाल

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात होळी सण उत्साहात साजरा झाला. त्यानंतर सोमवारी दुसऱ्या दिवशी बच्चेकंपनीसह नागरिकांनी धुळवडीचा आनंद लुटला.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात लहान मुलांनी सकाळपासूनच रंग खेळण्यास सुरुवात केली. विविध प्रकारच्या पिचकारीतून रंग उडवताना बच्चेकंपनी दिसली. शहरात ग्रामस्थांसह महिलांनीही एकमेकांवर रंग उडवून आनंद लुटला. काही ठिकाणी संगीत, खाण्याची मेजवानी ठेवण्यात आली होती.

तरुणांनी आपल्या ग्रुपसोबत बेधुंद होऊन एकमेकांना रंग लावला. या दरम्यान दिवसभर कुठलीही वर्दळ रस्त्यावर दिसून आली नाही. फक्त रंगीबेरंगी लोक रस्त्यावर दिसून येत होते. ग्रामीण भागात खालु बाजाच्या वाद्यवृंदावर तरुण, मुले, ग्रामस्थ नृत्य करताना दिसले, तर काहींनी सोंग घेतल्याचे दिसून आले.



# आरसीबीचा पंजाबवर विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दिनेश कार्तिकची तुफान फटकेबाजी आणि विराट कोहलीच्या विस्फोटक ७७ धावांच्या जोरावर रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी)ने आयपीएलमधील पहिला विजय नोंदवला. आरसीबीने चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या घरच्या मैदानावर पंजाब किंग्सचा चार विकेट्सने पराभव केला. दिनेश कार्तिकच्या शानदार चौकारासह आरसीबीने तीन चेंडू राखून पंजाबवर चार विकेट्सने विजय मिळवला.

विराट बाद झाल्यानंतर आलेल्या दिनेश कार्तिकने सुरूवातीपासूनच आक्रमक अंदाज दाखवला आणि चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. कार्तिकने त्याच्या १० चेंडूंच्या खेळीत तीन चौकार आणि दोन षटकारांसह २८ धावा केल्या, तर सबस्टीट्यूट म्हणून आलेल्या महिपाल लोमरोरने त्याला साथ देत आठ चेंडूंत एक षटकार आणि दोन चौकारांसह १७ धावा केल्या. या दोघांच्या अखेरच्या षटकांमधील आक्रमक खेळीमुळे आरसीबीने आयपीएल २०२४मध्ये पहिला विजय नोंदवला.

पंजाब किंग्सने दिलेल्या १७७ धावांचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात खूपच दणक्यात झाली. सॅम करनच्या पहिल्याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर पहिले आणि सातव्या षटकात विराट कोहलीला जीवदान मिळाले. बेयरस्टोने स्लिपमध्ये कोहलीचा झेल सोडला, तर राहुल चहरनेही कोहलीचा झेल सोडला आणि याचा फटका पंजाबला पहिल्या षटकासह संपूर्ण सामन्यात बसला. विराटने विस्फोटक फलंदाजी करीत बाद होण्यापूर्वी ४९ चेंडूंत ११ चौकार आणि दोन षटकारांसह ७७ धावा केल्या. फॅफ डू प्लेसिस आणि कॅमेरून ग्रीन मात्र या सामन्यात अपयशी ठरले आणि दोघेही तीन धावा करत रबाडाच्या गोलंदाजीवर झेलबाद झाले. त्यानंतर आलेला रजत पाटीदार चांगल्या फॉर्मात असला तरी



## विराटचे शानदार अर्धशतक

मोठी खेळी करू शकला नाही. पंजाबचा भेदक गोलंदाजी करणारा हरप्रीत ब्रारकडून त्रिफळाचीत होण्यापूर्वी त्याने एक चौकार आणि षटकारासह १८ धावा केल्या, तर मॅक्सवेल आजच्या सामन्यातही अपयशी ठरला आणि ब्रारच्याच गोलंदाजीवर तीन धावा करीत क्लीन बोल्ड झाला.

विराट चांगल्या फॉर्मात असल्याने त्याला बाद करणे अवघड झाले होते, पण आरसीबी संघातील त्याचा पूर्वीचा साथीदार हर्षल पटेल जो आता पंजाब संघाचा भाग आहे. त्याने विराटला झेलबाद केले. विराट बाद झाल्यानंतर १४ धावांवर अनुज रावतही झेलबाद झाला. पंजाब संघाकडून हरप्रीत ब्रारने उत्कृष्ट गोलंदाजी करीत चार षटकांच्या स्पेलमध्ये १३ धावा देत दोन विकेट घेतल्या. कगिसो रबाडाच्या खात्यातही दोन विकेट्स आल्या, तर सॅम करन आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी आरसीबी संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेत पंजाब संघाला फलंदाजीसाठी पाचारण केले. प्रथम फलंदाजी करताना पंजाबची सुरुवात चांगली झाली, पण त्यांचा लामीवीर बेयरस्टोने आठ धावा करीत विकेट गमावली, तर शिखर धवन मॅक्सवेलच्या चेंडूवर बाद होण्यापूर्वी ३७ चेंडूंत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४५ धावा केल्या. शिखरशिवाय कोणताही फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही, पण प्रत्येकाने संघाच्या धावांमध्ये भर घातली. प्रभसिमरन सिंग (२५), लिव्हिंगस्टोन (१७), सॅम करन (२३), जितेश शर्मा (२७) या चौघांनाही बाद करण्यात गोलंदाजांसोबतच विकेटकीपर अर्जुन रावतने मोठी भूमिका बजावली. त्याने या चौघांचेही झेल टिपले.

पंजाबच्या शशांक सिंगने आपल्या छोट्या पण प्रभावी खेळीने सर्वांनाच चकित केले. शशांकने अखेरच्या आठ चेंडूंत दोन षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने २१ धावा केल्या. त्याच्या या अखेरच्या षटकातील फटकेबाजीमुळे संघाची धावसंख्या १७६वर गेली. आरसीबीकडून ग्लेन मॅक्सवेल आणि मोहम्मद सिराजने प्रत्येकी दोन, तर यश दयाल आणि अल्झारी जोसेफने प्रत्येकी एक विकेट घेतली.



# आक्षी खाडीत रंगली होड्यांची शर्यत

**अलिबाग : प्रतिनिधी**

यांत्रिकीकरणाच्या युगात हाताने वल्हवण्याच्या होड्या केव्हाच कालबाह्य झाल्या आहेत. तरीदेखील नवीन पिढीला आणि पर्यटकांना त्याची माहिती व्हावी यासाठी अलिबागच्या आक्षी गावातील पांडवादेवी मित्र मंडळ रायवाडी यांनी प्रयत्न सुरू ठेवले आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही आक्षी येथे हाताने वल्हवण्याच्या होड्यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

धुळवडीचे औचित्य साधून आक्षी खाडीत झालेल्या या स्पर्धेत १२ होड्या सहभागी झाल्या होत्या. लहान आणि मोठ्या अशा दोन गटांत स्पर्धा रंगली. स्पर्धा पाहण्यासाठी हौशी नागरिकांनी गर्दी केली होती.

छोट्या गटात प्रथम क्रमांक मित जग्गू-भाग्येश जग्गु आणि दुसरा क्रमांक यज्ञेश पाटील-गणेश वादळे यांनी; तर मोठ्या गटात प्रथम क्रमांक अनिकेत बानकर-दुर्गेश बानकर, दुसरा क्रमांक प्रथम लाल-ओमकार वादळे आणि तृतीय क्रमांक बॉक्स फायटर-विपूल बानकर यांनी पटकाविला. विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले.

दरवर्षी या स्पर्धेसाठी होडी चालक जय्यत तयारी करीत असतात. आपल्या होडीचे रंगकाम केले जाते, नवीन वल्हे तयार केले जातात. स्पर्धा आक्षी पुलापासून सुरू होते आणि तीन किलोमिटर अंतरावर फेरी मारून स्पर्धक परत येतात. ही स्पर्धा पाहणे हा एक विलक्षण अनुभव असतो. जाताना होड्या वेगात जातात, पण येताना होडीचा समतोल राखून आणाव्या लागतात. चालकांचे कसब या वेळी पणाला लागते.

**पूर्वी प्रवासासाठी किंवा मासेमारीसाठी अशा छोट्या होड्या वापल्या जात असत. यांत्रिकीकरण तसेच प्रवासाची पर्यायी साधने उपलब्ध झाल्यामुळे अशा होड्यांचा वापर जवळपास बंदच झाला, परंतु ही आपली परंपरा आहे. ती नवीन पिढीला माहीत व्हावी हा आमचा या स्पर्धेमागचा प्रमुख हेतू आहे.**
**-किशोर बानकर, आयोजक**

# बॉर्डर-गावसकर चषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात दरवर्षी होणाऱ्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीचे वेळापत्रक क्रिकेट ऑस्ट्रेलियाने जाहीर केले आहे. भारतीय क्रिकेट संघ या वर्षाच्या अखेरीस ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे.

बॉर्डर-गावसकर ट्रॉफी कसोटी मालिकेमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच सामने खेळवले जाणार आहेत. ३२ वर्षांनंतर भारत आणि ऑस्ट्रेलियाचे संघ पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहेत. शेवटची पाच सामन्यांची मालिका १९९१-९२मध्ये खेळली गेली होती. यजमान ऑस्ट्रेलियाने ही मालिका ४-१ने जिंकली. या मालिकेतील सिडनी येथे झालेल्या कसोटीत रवी शास्त्रीने द्विशतक झळकावले होते आणि युवा सचिन तेंडुलकरने पर्थच्या खेळपट्टीवर शतक झळकावले होते.

या मालिकेची सुरुवात २२ नोव्हेंबरपासून पर्थ येथील सामन्याने होईल, जी २६ नोव्हेंबरपर्यंत खेळवली जाईल. मालिकेतील दुसरा सामना ६ ते १० डिसेंबरदरम्यान डलेड ओव्हल येथे खेळवला जाईल. हा सामना दिवस-रात्र कसोटी असेल. तिसरा सामना १४ ते १८ डिसेंबरदरम्यान ब्रिस्बेनमधील गाबा मैदानावर होणार आहे. चौथ्या सामन्यात दोन्ही संघ २६-३० डिसेंबरदरम्यान मेलबर्नमध्ये आमनेसामने येतील. या मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना ३ ते ७ जानेवारीदरम्यान सिडनी क्रिकेट मैदानावर होणार आहे.

**असे होतील सामने**

**पहिली कसोटी :** २२-२६ नोव्हेंबर, पर्थ स्टेडियम, पर्थ
**दुसरी कसोटी :** ६-१० डिसेंबर, डलेड ओव्हल, डलेड (दिवस-रात्र कसोटी)
**तिसरी कसोटी :** १४-१८ डिसेंबर, गाबा, ब्रिस्बेन
**चौथी कसोटी :** २६-३० डिसेंबर, मेलबर्न क्रिकेट ग्राउंड, मेलबर्न
**पाचवी कसोटी :** ३-७ जानेवारी, सिडनी क्रिकेट ग्राउंड, सिडनी

# शालेय क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे आणि टाटा कॅपिटल आयोजित सुधागड तालुकास्तरीय शैक्षणिक व क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पाली येथील ग. बा. वडेर हायस्कूल येथे झाला.

या वेळी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे व समन्वयक बळीराम निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले, तर सुधागडातील शाळांना आवश्यक ती सर्व प्रकारची मदत सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे यांच्याकडून केली जाईल. सुधागडातील शाळांतून शिकणारा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि युपीएससी, एमपीएससीच्या परीक्षांमध्येही चमकला पाहिजे, अशी अपेक्षा घाडगे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे उपाध्यक्ष वसंत लहाने, सरचिटणीस राजू पातेरे, उपखजिनदार विजय जाधव, प्रसिद्धीप्रमुख अजय जाधव, कार्यकारी सदस्य हरिश्चंद्र मालुसरे, ग.बा. वडेर हायस्कूलचे प्राचार्य भाऊसाहेब घोडके, संदेश उतेकर, नरेश शेडगे, सुजीत जगताप, पाटील, पाफाळे, वाघुले, खाडे आदी विविध शाळांचे प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# अक्षय किंग्स संघाने जिंकला होळी चषक



**खारघर : प्रतिनिधी**

होळी आणि धुळवडीनिमित्त खारघर कोपरा येथील दत्त कृपा क्रिकेट क्लबच्या वतीने दोन दिवसीय होळी चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चषकावर अक्षय किंग्स या संघाने आपले नाव कोरत प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत जयवंत आर्मी संघ उपविजेता ठरला. वैयक्तिक बक्षिसांमध्ये मालिकावीर करण भोईर, सामनावीर सचिन पवार, उत्कृष्ट फलंदाज अक्षय पाटील, उत्कृष्ट गोलंदाज अंश गायकर व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून साहिल कोळी याची निवड करण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभाला पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, माजी सरपंच संतोष तांबोळी, सुरेश ठाकूर, ज्ञानेश्वर पवार, कमलाकर तोडेकर, मनोहर ठाकूर, दिनेश ठाकूर, जगदीश पवार आदी उपस्थित होते. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी राजन तोडेकर व महेश पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.



# रोहितने साजरी केली धुळवड

**मुंबई : प्रतिनिधी**

देशभरात सोमवारी धुळवड साजरी करण्यात आली. भारतीय संघाचा कर्णधार आणि मुंबई इंडियन्सचा आघाडीचा फलंदाज रोहित शर्मानेही धुलिवंदनचा आनंद घेतला, ज्याचा व्हिडीओ रोहितने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. ३७ वर्षांचा अगदी एखाद्या लहान मुलासारखा या सणाचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहे.

रोहित शर्माने पत्नी रितिका सजदेह आणि मुलगी समायरासोबत रंगपंचमी खेळताना या व्हिडीओमध्ये दिसत आहे. रोहितसोबत मुंबई इंडियन्स संघातील काही सहकारीही या व्हिडीओमध्ये आहेत. रोहित लेकीला आणि पत्नीला रंग लावत आहे. रोहित नाचण्याचा आनंद घेतानाही दिसला.

# विराटने धवनला मागे टाकत धोनीच्या विक्रमाशी साधली बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा फलंदाज विराट कोहलीने पंजाब किंग्जविरुद्ध अर्धशतकी खेळी खेळून अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. या सामन्यात विराटने शिखर धवनचा एक विक्रम मोडला. त्याचबरोबर त्याने महेंद्रसिंह धोनीच्या एका विक्रमाशी बरोबरी साधली.

विराट कोहलीने पंजाबविरुद्ध आयपीएलमधील ५१वे अर्धशतक झळकावले. यासह तो या स्पर्धेत सर्वाधिक अर्धशतक ठोकणारा भारतीय फलंदाज ठरला. यामध्ये विराटने शिखर धवनला मागे सोडले, ज्याच्या नावावर आयपीएलमध्ये ५० अर्धशतके आहेत. आयपीएलमध्ये सर्वाधिक अर्धशतके झळकावण्याचा एकूण विक्रम दिल्ली कॅपिटल्सचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नरच्या नावावर आहे. वॉर्नरने या स्पर्धेत आतापर्यंत ६१ अर्धशतके झळकावली आहेत.

**ऑरेंज कॅपच्या शर्यतीतही आघाडीवर**

पंजाबविरुद्ध खेळलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर आरसीबीचा फलंदाज विराट कोहली या मोसमात ऑरेंज कॅपच्या शर्यतीत पुढे गेला आहे. आयपीएलच्या चालू मोसमात कोहलीने दोन सामन्यांत ९८ धावा केल्या आहेत.

पंजाबविरुद्ध खेळलेल्या शानदार अर्धशतकी खेळीसाठी विराट सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. त्याचा हा आयपीएलमधील १७वा सामनावीर पुरस्कार होता. त्याने हा पुरस्कार सर्वाधिक वेळा जिंकण्यात चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीची बरोबरी केली आहे. मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माने १९ वेळा सामनावीराचा पुरस्कार पटकाविला आहे.

# सातव्या क्रमांकावर खेळण्यावरून हार्दिकची पोलार्डकडून पाठराखण

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या सलामीच्या लढतीत पराभूत होण्याची मुंबई इंडियन्सची मालिका सलग १२व्या वर्षी कायम राहिली. रविवारी झालेल्या या सामन्यात मुंबईला आपला नवा कर्णधार हार्दिक पांड्याचा माजी संघ गुजरात टायटन्सकडून पराभव पत्करावा लागला. या सामन्यात हार्दिकने सातव्या क्रमांकावर फलंदाजी केली आणि त्याच्या या निर्णयाचे अनेकांना आश्चर्य वाटले, मात्र हा निर्णय केवळ हार्दिकने नाही, तर पूर्ण संघ व्यवस्थापनाने मिळून घेतला होता, असे मुंबईचा फलंदाजी प्रशिक्षक किरॉन पोलार्डने स्पष्ट केले.

या सामन्यात गुजरातने दिलेल्या १६९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईचा संघ सुस्थितीत होता. त्यांना ३० चेंडूंत ४३ धावांची आवश्यकता होती आणि त्यांचे सात फलंदाज शिल्लक होता, मात्र यानंतरच्या दोन षटकांत मिळून मुंबईला केवळ सात धावा करता आल्या आणि त्यांनी खेळपट्टीवर स्थिरावलेल्या डेवाल्ड ब्रेव्हिसला (४६) गमावले. यानंतर हार्दिकने सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला येण्याऐवजी टीम डेव्हिडला पाठवले. डेव्हिडला १० चेंडूंत ११ धावाच करता आल्या. मग सातव्या क्रमांकावर फलंदाजी आलेल्या हार्दिकने अखेरच्या षटकातील पहिल्या दोन चेंडूंवर अनुक्रमे षटकार आणि चौकार मारला, मात्र उमेश यादवने टाकलेल्या या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर तो बाद झाल्याने मुंबईच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. मुंबईला अखेर सहा धावांनी हार पत्करावी लागली.

'केवळ हार्दिकला दोष देणे थांबले पाहिजे. आम्ही चर्चा करून सर्वांच्या सहमतीनेच निर्णय घेतो. त्यामुळे कोणत्याही निर्णयासाठी एकट्या हार्दिकला जबाबदार धरणे योग्य नाही,' असे म्हणत पोलार्डने आपल्या कर्णधाराला पाठिंबा दर्शवला.



# राजस्थानची लखनऊवर मात

**जयपूर** : आयपीएलच्या १७व्या हंगामातील सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स आमनेसामने आले होते, ज्यामध्ये राजस्थानने २० धावांनी साामना जिंकत विजयाने हंगामाची सुरुवात केली आहे.

प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्स संघाने कर्णधार संजू सॅमसनच्या वादळी अर्धशतकाच्या जोरावर ४ बाद १९३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात लखनऊ सुपरजायंट्सला कर्णधार केएल राहुल आणि निकोलस पूरनच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर ६ बाद १७६ धावाच करता आल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com